# पक्षिमित्र

महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

संपादक : दिगंबर गाडगीळ

- वर्ष – चौदावे
- अंक ४ था
- १ जुलै २०२४
- पाने – २८



कन्हैया उदापुरे

# क्षणचित्रे



धनेश मित्र संमेलनाचे उद्घाटन करताना मान्यवर



धनेश मित्र पुरस्कार स्वीकारताना कु. अनुजा माईन



रोहित नानिवडेकर धनेश पक्ष्यांना असणारे धोके याविषयी गट चर्चेत मार्गदर्शन करताना



कुडासे सिंधुदुर्ग येथे पार पडलेल्या धनेश मित्र संमेलनात सहभागी



कोकणातील धनेश पक्ष्यांची सद्यस्थिती यावर बोलताना प्रतिक मोरे



राज्यसभा सदस्य व काँग्रेसचे देशपातळीवरील जेष्ठ नेते मा. मुकुलजी वासनिक,अमरावती येथे आले असता त्यांची भेट घेतली यावेळी महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेची  माहिती दिली. व पक्षिमित्र अंक भेट दिला



धनेश मित्र संमेलनातील सहभागी मान्यवर

**संपादक**

**श्री.दिगंबर गाडगीळ**
C/o यशवंत पटवर्धन ४४/३० रूबी । शिवदर्शन पर्वती, ।
शतायू भवन शेजारी । राज अपार्टमेंट, पुणे । ९
चलभाष : ९८८१०७९७११

---

**कार्यकारिणी**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती<br>**मो. ९८२२८७५७७३** |
| कार्याध्यक्ष | – | **डॉ. राजू कसंबे**, ठाणे<br>**मो. ९००४९२४७३१** |
| संघटक | – | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर<br>**मो. ९८५०२९१३२४** |
| कार्यवाह | – | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती<br>**मो. ९८२२२०४०७०** |
| सहकार्यवाह | – | **श्री. शरद आपटे**, सांगली<br>**मो. ९८९०३८४४००** |
| सहसंघटक | – | **डॉ. अनिल माळी**, नाशिक<br>**मो. ९८५०८१८६४४** |
| सदस्य | – | **प्रा. डॉ. निनाद शाह**, सोलापूर<br>**मो. ९४२२४५९९१५** |
| सदस्य | – | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद<br>**मो. ९४२२२०२६२८** |
| सदस्य | – | **श्री. दिलीप विरखडे**,वर्धा<br>**मो. ७७७५८८३८६१** |
| सदस्य | – | **श्री. अविनाश कुबल**,ठाणे<br>**मो. ९३२४२३८०३१** |
| सदस्य | – | **कु. रूपाली मढवी**,मुंबई<br>**मो. ९८६९५५९९२२** |

**सल्लागार मंडळ**

| | | |
|---|---|---|
| श्री. भाऊ काटदरे | (चिपळूण) | मो. ९४२३८३१७०० |
| श्री. दिगंबर गाडगीळ | (पूणे) | मो. ९८८१०७९७११ |
| डॉ. दिलीप यार्दी | (औरंगाबाद) | मो. ९४२२७०४२२१ |
| डॉ. अनिल पिंपळापुरे | (नागपुर) | मो. ९८८१७१३४६६ |
| श्री. बापुसाहेब भोसले | (अहमदनगर) | मो.९८२२६३३१३३ |


# संपादकीय

## पक्षी मोजदाद



**दिगंबर गाडगीळ**
संपादक, महाराष्ट्र पक्षिमित्र अंक
dgadgil09@gmail.com

संस्थेशिवाय सामान्य माणूस सांगू शकेल का ? महाराष्ट्रातील पक्षिजीवन घसरत आहे . इतर राज्यातील परिस्थिती खडतर असावी या अंकातील अध्यक्षीयमध्ये अध्यक्षांनी धनेशाचा उल्लेख केला आहे तो पक्षी आकाराने मोठाच आहे. लहान पक्ष्यांचे काय ? काही वर्षांपूर्वी कॉलेजच्या आवारामध्ये सकाळ-संध्याकाळ फार मोठ्या संख्येने जमायचे. आता तो आवाज येत नाही. सकाळी कोर्टाच्या आवारात देखील खूप मैना गर्दी करायच्या आता उंच इमारतींमध्ये आश्रयस्थान मिळू लागल्याने कबुतरांची संख्या शहरात वाढू लागली आहे. म्हणजे मोठ्या आकाराचे पक्षी कमी होत आहे असे म्हणायला हरकत नाही. मोठ्या आकाराचे पक्षी सहज पाहिले जातात मागे मी नान्नजच्या अभयारण्यात ४/५ माळढोक एकत्रितपणे पाहिले आहेत. आता केवळ एक मादी दिसते.

दर दहा वर्षांनी म्हणजे किती राहिले आहेत ? तसेच पशुधनही मोजले जाते पण पक्षीधन कुठे मोजले जाते.उभ्या पिकांमधील किडे खाणारे पक्षी किती आहेत ही मोजदाद कुठे होते !

यंदाच्या पक्षी सप्ताहात पक्ष्यांची गणना व्हावी अशी मागणी करून थांबतो, ही मोजणी सोपी नाही,पण म्हणून ती करायची नाही असे कसे चालेल !

*****

**मुखपृष्ठ :- मलबार पाईड हॉर्नबिल – छायाचित्रकार- प्रा. डॉ. गजानन वाघ**

# ✻ अध्यक्षीय ✻



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com
9822875773

देशभरात सध्या संपण्याचा ज्वलंत धोका असणाऱ्या पक्ष्यांच्या यादीत अनेक पक्षी आहेत, त्यामध्ये दरवर्षी नवीन प्रजातींची भर पडत आहे. भारतात सापडणाऱ्या सर्वच हॉर्नबिल प्रजाती सध्या संकटात आहेत. महाराष्ट्रात धनेश अर्थात हॉर्नबिलच्या चार प्रजाती आढळून येतात. यामध्ये राखी धनेश, मलबारी धनेश, मलबारी कवडा धनेश व महाधनेश ह्या त्या प्रजाती आहेत. यातील मलबारी धनेश हा फक्त मलबार प्रदेशात म्हणजे महाराष्ट्रात फक्त सह्याद्रीतच आढळतो. मलबारी कवडा धनेश व महाधनेश ह्या प्रजाती बऱ्यापैकी दिसतात पुन्हा प. घाटातच, मात्र मलबारी कवडा धनेश विदर्भातील मेळघाट, पेंच, ताडोबा व्याघ्र प्रकल्पात सुद्धा आढळत असून महाराष्ट्राच्या अतिपूर्वेकडील गडचिरोलीच्या जंगलात महाधनेश व मलबारी कवडा धनेश सुद्धा अतिशय कमी प्रमाणात आढळून येतात. चौथी प्रजाती म्हणजे राखी धनेश. भारतात सर्वत्र आढळणारा, आपल्या देशाचा प्रदेशानिष्ट असा राखी धनेश महाराष्ट्रात सर्वत्र आढळतो. गावखेड्या पासून ते शहरात, शेती प्रदेशात व सर्वच प्रकारचे जंगल अशी अधिवास विविधता वापरणारा हा पक्षी तसा परिस्थितीशी जुळवून घेणारा असल्याने आपले अस्तित्व टिकवून आहे. परंतु अलीकडे गावागावातील रस्ते रुंदीकरण व विकास प्रकल्पासाठी जुनी झाडे तोडली जात असल्याने या पक्ष्यांच्या घरट्यांच्या ढोली असलेली मोठी व जुनी झाडे मोठ्या प्रमाणात तोडली गेलीत, आणि त्याचा परिणाम याच्या संख्येवर दिसून येत आहे. जंगलतोड व विशेषता मोठ्या आकाराची जुनी झाडे तोडली गेल्याने जगभरातील हॉर्नबिलच्या प्रजाती आज संकटात आहेत. हॉर्नबिलला जंगलाचा शेतकरी म्हटले जाते. जंगलातील वृक्षांच्या बियांच्या प्रसाराचे मुख्य काम या पक्ष्यांमार्फत होत असते. यांच्या खाद्यातून व विष्टेतून जंगलात पसरणाऱ्या बिया लवकर रुजतात व जंगलातील वृक्षांचे आच्छादन व विविधता वाढण्यास मदत होत असते. या हॉर्नबिल प्रजातींना वाचविण्यासाठी जगासोबतच भारतात सुद्धा गेल्या दहा वर्षापासून विविध प्रकल्पांच्या व संस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात संशोधन व जनजागृतीचे काम होत आहे.

प. घाट म्हणजेच सह्याद्रीमध्ये महाराष्ट्रातील चारही धनेश सापडतात. सह्याद्री मधील विविध प्रकल्प आणि बदलत्या संस्कृतीमुळे जंगलाचे प्रमाण झपाट्याने कमी होत आहे. जंगलातील मोठाली झाडे तोडली जात असल्याने हॉर्नबिलच्या संख्येवर त्याचा विपरीत परिणाम दिसून येत आहे. या प्रजातींच्या संवर्धनाची दिशा ठरविण्यासाठी यावर्षी प्रथमच धनेशमित्र संमेलन पार पडले. धनेशमित्र निसर्ग मंडळ व सह्याद्री प्रकल्प सोसायटी यांच्या संकल्पनेतून हे संमेलन मार्च महिन्यात रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुख यथे पार पडले. श्री. प्रतिक मोरे यांच्या पुढाकारातून या संमेलनासाठी अनेक संस्था व संशोधकांनी यामध्ये आपला सहभाग नोंदविला होता. या संमेलनात धनेश संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या स्थानिक कार्यकर्त्यांचा पुरस्कार देऊन सत्कार सुद्धा करण्यात आला. प्रसिद्ध हॉर्नबिल संशोधक डॉ. पूजा पवार आणि डॉ. रोहित नानिवडेकर हे सुद्धा या संमेलनात सहभागी झाले होते. (तरुण भारत) वृत्तपत्राने या संमेलनास दिलेल्या प्रसिध्दीमुळे हे संमेलन राज्यभर पोहोचले.

या संमेलनाच्या यशस्वी आयोजनानंतर पुन्हा दुसरे धनेशमित्र संमेलन २ जून २०२४ रोजी दोडामार्ग तालुक्यातील वानोशी कुडासे येथे पार पडले. या संमेलनास सुद्धा भरघोस असा प्रतिसाद लाभला. या माध्यमातून धनेशाचे महत्त विषद झाले आणि त्याबाबत जनजागृती झालीच. शिवाय या दोन्ही संमेलनात झालेल्या चर्चेतून धनेश संवर्धन आराखडा तयार केला जाणार असून त्या माध्यमातून सर्व यंत्रणांना सोबत घेऊन भविष्यात धनेश प्रजाती संवर्धनाच्या दृष्टीने सकारात्मक वातावरण निर्माण होईल यात शंका नाही. सदर आयोजनासाठी ज्यांनी पुढाकार घेतला तसेच विविध संस्थांनी आर्थिक व इतर माध्यमातून मदत केली त्या सर्वाना मानाचा मुजरा.

मुंबईच्या समुद्रातील ठाणे खाडी, उरण, शिवडी, भांडूप पंपिंग स्टेशन, डीपीएस स्कूल, टी.एस. चाणक्य आणि पांजे या भागात उन्हाळ्यात हजारोच्या संख्येत लेसर ग्रेटर फ्लेमिंगो वास्तव्यास असतात. त्यांच्या अस्तित्वाने हा परिसर गुलाबी होऊन जातो. भारताची आर्थिक राजधानी असलेले मुंबई हे जगातील सर्वात गजबजलेले शहर असून येथील विमानतळ हे जगातील सर्वात जास्त हवाई वाहतूक असलेले ठिकाण आहे. या ठिकाणी २० मार्च रोजी दुबई–मुंबई विमानास धडकून ४० लेसर फ्लेमिंगो मृत्युमुखी पडले. पक्ष्यांच्या धडकण्यामुळे जगात आजवर अनेक विमान अपघात घडलेले आहेत. त्यामुळे मानवासाठी अशा घटना धोक्याच्या असल्या तरी पक्ष्यांच्या विविध धोक्यांचा विचार करता मोठ्या आकाराच्या पक्ष्यांसाठी हा आणखी एक गंभीर धोका

आहे. यातून समाधानकारक मार्ग काढणे आज भयंकर जिकीरीचे काम झाले आहे.

मे महिन्याचा तिसरा शुक्रवार हा जगभरात धोकाग्रस्त प्रजाती दिवस म्हणून साजरा केला जातो. याच मे महिन्यात विदर्भाच्या तप्त उन्हाळ्यात विदर्भातील पेंच व्याघ्र प्रकल्पात ७ मे रोजी तणमोर हा अति धोकाग्रस्त श्रेणीतील पक्षी आढळून आला. महाराष्ट्र पक्षीमित्रचे आजीव सभासद तथा पक्षी पर्यटन क्षेत्रात काम करणारे श्री. अविनाश भगत यांना त्यांच्या पेंच सहली दरम्यान हा पक्षी आढळून आला. त्यांनी त्याचे सुंदर फोटो व व्हिडिओ सुद्धा घेतले. तणमोर हा गवताळ माळरानातील पक्षी मात्र जंगलातील एका पाणवठ्यावर आढळून आला. या पक्ष्यांवर आजवर अनेक संशोधने झालीत, तरीही या प्रजाती बाबत अनेक गोष्टी आपल्याला माहीत नाही. हा पक्षी स्थलांतर करतो की स्थानिक रहिवाशी आहे? स्थलांतर करीत असतील तर किती प्रमाणात स्थलांतर होते? कधी, कुठे व का स्थलांतर केले जाते ? असे अनेक प्रश्न आज देखील अनुत्तरित आहेत. दुर्मिळ तणमोराची नोंद ही पेंच व्याघ्र प्रकल्पातील पहिली नोंद ठरली. यासाठी श्री. अविनाश भगत यांचे अभिनंदन.

महाराष्ट्र पक्षीमित्र चे पुढील ३७ वे संमेलन अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव येथे साधारणतः डिसेंबर दरम्यान होणार आहे. या संमेलनाचे आयोजक असलेले न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज शेवगाव येथे नुकतेच एका संयुक्त सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेमध्ये संमेलनाचे आयोजन नियोजनबद्ध होण्यासाठी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. संमेलनाचे ठिकाण, संमेलनासाठी येणाऱ्या प्रतिनिधींची निवास व्यवस्था तसेच जवळच असलेल्या जायकवाडी पक्षी अभयारण्य या ठिकाणी पक्षिमित्रांना भेट देता यावी यासाठी केली जाणारी व्यवस्था याबाबत सविस्तर चर्चा पार पडली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंडे व महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद यांनी या सभेमध्ये भाग घेऊन संमेलनाचे व्यवस्थित आयोजन केले जाईल याची ग्वाही दिली. या सभेसाठी महाराष्ट्र पक्षीमित्रचे जेष्ठ सल्लागार श्री बापूसाहेब भोसले, संघटक प्रा.डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, कार्यवाह प्रा.डॉ. गजानन वाघ, सक्रीय सभासद, सौरभ जवंजाळ तथा अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर उपस्थित होते.

शेवगाव दौऱ्यानिमित्त राज्यातील पक्षीमित्र सभासदांची भेट घेण्याच्या दृष्टीने औरंगाबाद येथे एका सभेचे आयोजन करण्यात आले होते. म. प. चे कार्यकारिणी सदस्य श्री. किशोर गठडी यांनी स्थानिक सभेचे नियोजन केले. या सभेसाठी प्रा.डॉ. रमेश चोंढीकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी सभासदांशी विविध विषयांवर चर्चा पार पडली. याच दरम्यान आणखी काही जिल्ह्यातून सुद्धा निमंत्रण मिळाली होती परंतु सर्वांपर्यंत पोहोचता आले नाही त्याबद्दल दिलगीर आहोत. भविष्यात अशाच सभांचे राज्यात विविध ठिकाणी आयोजन करून आपले नेटवर्क आणखी मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. राज्यभर पसरलेले पक्षिमित्र हीच आपली ताकद आहे. याच ताकदीवर पक्षी संवर्धनासाठी आणखी जोमाने काम करू या. मिळून सारे जण । करू व्दिजगण रक्षण ।।




*****

# धनेश संवर्धनाची नांदी



**प्रतिक मोरे**
कार्यकारी संचालक,
सह्याद्री संकल्प सोसायटी
देवरूख,रत्नागिरी

सह्याद्रीची जंगले आणि कोकण परिसर हा जैवविविधतेच्या दृष्टीने संपन्न असणारा परिसर. सदाहरित आणि पानझडी जंगले, गवताळ मैदाने, गावागावातील देवराया आणि इथे वावरणारे अनेक दुर्मिळ प्रदेशनिष्ठ वन्यजीव. यांतील वन्यजीवांपैकी एक महत्वाचा पक्षी म्हणजे धनेश पक्षी अर्थात हॉर्नबील, धनेश पक्षी निसर्गत: जंगलांची निर्मिती आणि अनेक वृक्षांच्या बीजांचा प्रसार करण्यात खूप मोलाचा हातभार लावतो. यामुळेच त्यांना जंगलाचे शेतकरी या नावाने ओळखले जाते. मात्र गेल्या काही वर्षी झालेल्या अमर्याद जंगलतोडीमुळे या पक्ष्याचे खाद्य असणारे वृक्ष आणि घरट्यांच्या ढोल्या असलेली झाडे नष्ट होत आहेत, आणि अनुषंगाने जंगलांचेही अस्तित्व धोक्यात आले आहे. या परिस्थितीची जाणीव बाळगणा–या आणि धनेश पक्ष्याच्या संरक्षणासाठी काम करणा–या संस्था आणि व्यक्तींचे 'धनेश मित्र संमेलन' नुकतेच कोकणातील रत्नागिरीत जिल्ह्यात देवरुख येथे आयोजित करण्यात आले होते.

कोकणातील धनेश पक्ष्यांच्या संवर्धनासाठी त्याच्या ढोल्यांचे संरक्षण आणि नोंदणी, अधिवासाचे पुनरुज्जीवन, खाद्यफळांच्या वृक्षांची लागवड, खाजगी जागेतील धनेश पक्ष्यांच्या ढोल्यांचे संवर्धन आणि जनजागृती या पातळ्यांवर काम करणे आवश्यक असल्याचा उहापोह शनिवारी दि. २३ मार्च २०२४ रोजी देवरुखमध्ये पार पडलेल्या धनेशमित्र संमेलनात करण्यात आला. कोकणात पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध संस्थांनी एकत्र येऊन स्थापन केलेले धनेशमित्र निसर्ग मंडळ आणि देवरुख मधील सह्याद्री संकल्प सोसायटी आणि एन सी एफ यांच्या संकल्पनेतून हे संमेलन आयोजित करण्यात आले होते.

देवरुखमधील आठल्ये–सप्रे–पित्रे महाविद्यालयातील एस.के.पाटील सभागृहात ९ ते सायंकाळी ५ या वेळेत महाराष्ट्रातील पहिले धनेशमित्र संमेलन पार पडले. या संमेलनाला नेचर कॉन्झर्वेशन फाऊंडेशन आणि गोदरेज कन्झुमर प्रोडक्ट्स लिमिटेड यांनी अर्थसहाय्य पुरवले. संमेलनाच्या उद्घाटनाच्या प्रसंगी व्यासपीठावर देवरुख शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सदानंद भागवत, ज्येष्ठ वन्यजीव संशोधक भाऊ काटदरे, ए.एस.पी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर, रत्नागिरीचे मानद वन्यजीव रक्षक निलेश बापट, नेचर कॉन्झर्वेशन फाऊंडेशनचे वन्यजीव संशोधक डॉ रोहित नानिवडेकर आणि वनस्पती अभ्यासक डॉ अमित मिरगळ हे उपस्थित होते.कोकणात ककणेर म्हणून ओळख असलेल्या या पक्ष्याच्या संवर्धनासाठी दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक आहे. कोकणात केली जाणारी निसर्गाची पूजा हीच वन्यजीव संवर्धनाचा पाया आहे, असे प्रास्ताविक सदानंद भागवत यांनी केले. सह्याद्री संकल्प सोसायटीचे कार्यकारी संचालक प्रतीक मोरे यांनी संमेलनाच्या पहिल्या सत्रात कोकणातील धनेश पक्ष्यांच्या नोंदीविषयी माहिती दिली. सीसीटीव्ही कॅमेरा लावून देवरुखमध्ये धनेश पक्ष्यांच्या प्रजनन क्रिया कशा पद्धतीने नोदवल्या जात आहेत, याविषयी त्यांनी पुढे माहिती दिली. देवरुख परीसरात सुरू असलेले त्यांचे धनेश पक्षी निरीक्षण–अभ्यास, संवर्धन आणि जनजागृतीचे कार्य याबाबत सादरीकरण केले. रत्नागिरी जिल्ह्यात आढळून येणाऱ्या धनेश पक्ष्याच्या प्रजाती आणि संख्या, त्यांच्या अधिवासा साठी आवश्यक असलेला जंगलाचा भाग, त्याच्या खाद्य वनस्पती, घरटे बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वृक्ष प्रजाती याबाबत माहिती दिली गेली. २०१७ मध्ये डॉ. शार्दूल केळकर यांच्या सोबत सुरू झालेला धनेश पक्षी निरीक्षणाचा प्रवास हा २०२४ मध्ये धनेश मित्र संमेलन आयोजित करण्या पर्यंत कसा येऊन पोचला हे त्यांनी सांगितले.

यानंतर धनेश पक्ष्याचे जंगलाचा शेतकरी म्हणून असलेले महत्त्व डॉ. रोहित नानिवडेकर यांनी आकडेवारी सह सादर केले. डॉ. रोहित नानिवडेकर हे नेचर कॉन्झरवेशन फाऊंडेशन या संस्थेमध्ये वन्यजीव संशोधक म्हणून कार्यरत आहेत. २००७ सालापासून ते धनेश पक्षावर संशोधन करत असून ईशान्य भारतातील धनेश पक्षांवर त्यांनी विशेष कार्य केले आहे. अंदमान बेटांपैकी एक असलेल्या नारकोंडा बेटावरील धनेश पक्ष्यावर त्यांनी पी. एच. डी. केली आहे. अरुणाचल प्रदेशमध्ये केलेल्या अभ्यासाची आकडेवारी त्यांनी सादर केली. या अभ्यासासाठी धनेश पक्षी खात असलेल्या मुख्यत: मोठ्या आणि कवचधारी फळे असणाऱ्या वनस्पती निवडण्यात आल्या. धनेश पक्षाचे घरटे असलेल्या वृक्षाच्या खाली जमीन स्वच्छ करून त्यावर खाली पडणाऱ्या बिया, फळे, त्यांची कवचे गोळा करण्यात आली. त्यांची संख्या मोजली असता एक धनेश पक्षी दर दिवशी दोन ते तीन हजार मोठ्या बिया

प्रति चौरस मीटर मध्ये पसरवत असतो हे लक्षात आले. त्याशिवाय छोटी फळेही धनेश मोठ्या प्रमाणावर खातात. एक धनेश पक्षी सुमारे ४०० छोटी फळे खातो. त्यानुसार एका फळात किमान ५० बिया गृहीत धरल्या तर वीस हजार छोट्या बिया जंगलात दर दिवशी पसरवत असतो. जंगलात या बिया २५० चौरस मीटर्स ते दहा किलोमोटर्स पर्यंतच्या भागात एक धनेश बिया पसरवतो. यावरून वनस्पतींच्या बीज प्रसारणात धनेश पक्षाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे हे लक्षात येते. अंदमान बेटांपैकी एक असलेल्या नारकोंडा बेटावर केलेल्या अभ्यासानुसार तेथे सर्वात जास्त म्हणजे एक चौरस मीटर्सला १०० यानुसार या १६ किलोमीटर्सच्या बेटावर १६०० हॉर्नबिल्स आहेत. तसेच याच भागात धनेश पक्षाचे खाद्यान्न असलेल्या फायकस वर्गातील वनस्पतींची संख्या जास्त आहे. यामुळेच धनेश पक्ष्यांचे पर्यावरणीय कार्य मोठे असून ते जपणे हे आपले कर्तव्य आहे असे प्रतिपादन याप्रसंगी त्यांनी केले. धनेश पक्ष्याला असलेले धोके – भारताच्या पूर्वांचल भागात धनेशाची मोठ्या प्रमाणावर शिकार होते. त्यातही हेल्मेटधारी हॉर्नबिलची शिकार जास्त होते. कारण त्याचे शिंगवरील कवच हे भरीव हस्तिदंता प्रमाणे असते. त्याचप्रमाणे जंगलतोड हे धनेशांची संख्या कमी होण्याचे खूप महत्त्वाचे कारण आहे असे निरीक्षण डॉ. रोहित नानिवडेकर यांनी मांडले.

यानंतर खुल्या स्वरूपाच्या चर्चासत्रामधून स्थानिकांना कोकणात धनेश पक्ष्यांच्या संवर्धनामध्ये असलेल्या आव्हानांविषयी बोलते केले. यावेळी स्थानिकांनी धनेशाला असलेल्या धोक्यांची यादी तयार केली. यात देवराईतील साध्या आणि छोट्या देवळांची होणारी भव्य पुनर्बांधणी, मानवी हस्तक्षेपमुळे लागणारे वणवे, दरड कोसळणे, रस्ता रुंदीकरण, जंगल तोड, आंबा,  काजू इ. बागायती वृक्षांची लागवड, विदेशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड, पर्यावरण शिक्षणाचा अभाव, सण, सांस्कृतिक समारंभ यानिमित्ताने होणारी पर्यावरणाची हानी, फोटोग्राफी असे धोके लोकांनी मांडले.

हवामान बदलामुळे घरट्यांवर होणारा प्रभाव तपासण्यासाठी वर्षांनुवर्षांच्या नोंदी आणि मोठ्या संख्येने धनेशाच्या घरट्यांचे निरीक्षण नोंदवणे आवश्यक आहे. हे निरीक्षण सिटीझन सायन्स प्रोग्रामअंतर्गत करता येऊ शकते, असे मत नानिवडेकर यांनी सत्राअंती मांडले. या सत्रानंतर महाएमटीबी आणि द हॅबिटॅट्स ट्रस्ट निर्मित महाधनेश पक्ष्यावरील माहितीपटाचे सादरीकरण झाले. यावेळी दै. मुंबई तरुण भारतचे वरिष्ठ पर्यावरण प्रतिनिधी अक्षय मांडवकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. धनेश पक्ष्यांना असणाऱ्या धोक्यांवर मात करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहेत, यावर खुल्या स्वरुपातील चर्चा सत्र पार पडले. कमी वेगाने वाढणाऱ्या झाडांचे इन–सिटू पद्धतीने संवर्धन करुन, वेगाने वाढणाऱ्या प्रजाती या धनेशाच्या अधिवास संवर्धनाच्या प्रकल्पामध्ये वापरणे आवश्यक असल्याचे मत वनस्पती अभ्यासक डॉ अमित मिरगळ यांनी मांडले.

धनेश पक्ष्यांच्या अधिवासाच्या पुनरुज्जीवनाविषयी नानिवडेकर यांनी प्रमुख मुद्दे मांडले. धनेशाच्या संवर्धनाच्या कामात येणारा सर्वात मोठा अडथळा म्हणजे स्थानिक झाडांच्या रोपांची उपलब्धता. मोठ्या संख्येने स्थानिक झाडांची रोपे तयार करणाऱ्या रोपवाटिकांना प्रोत्साहन देणे, हे धनेशाच्या अधिवास संवर्धनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकते, असे प्रतिपादन नानिवडेकर यांनी केले. त्यानंतर त्यांनी धनेशाचे छायाचित्रण करताना कोणती तत्वे पाळावीत, याविषयी महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले. सत्रादरम्यान धनेश पक्ष्यांविषयी वेगवेगळे खेळ पार पडले. धनेश संवर्धनाविषयी या संमेलनामधून नोंदवलेले प्रमुख मुद्दे हे सरकार दरबारी मांडण्यात येणार आहेत. सृष्टीज्ञान संस्था, देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ, सह्याद्री निसर्ग मित्र – चिपळूण, एन व्ही इको फार्म गोवा, महाराष्ट्र वन विभाग आणि दै. मुंबई तरुण भारत, निसर्ग सोबती – रत्नागिरी यांच्या सहकार्याने हे संमेलन पार पडले.

धनेशमित्र पुरस्कार : कोकणात धनेश पक्ष्यांच्या संवर्धनासाठी काम करणाऱ्या व्यक्तींचा संमेलनामध्ये धनेशमित्र पुरस्काराने सन्मान करण्यात आला. देवळे गावातील धनेशमित्र भरत चव्हाण, डॉ. अमित मिरगळ, राजापूरचे धनेशमित्र धनंजय मराठे, निसर्गाची राजदूत तनुजा माईन, सुप्रसिद्ध पक्षी छायाचित्रकार डॉ. शार्दुल केळकर आणि पर्यावरण पत्रकार अक्षय मांडवकर यांचा धनेशमित्र पुरस्काराने सन्मान करण्यात आला. तसेच कोंसुब, आंगवली, देवळे, देवडे, किरबेट, धामणी या ग्रामपंचायतींनी देखील धनेशाच्या संवर्धनासाठी पुढाकार घेतल्याने त्यांचा देखील सन्मान करण्यात आला.

*****

# सातपुड्यातील धनेश संशोधनाच्या निमित्याने ....



**प्रा. डॉ गजानन वाघ**

धनेशपक्षी अभ्यासक तथा

कार्यवाह महाराष्ट्र पक्षिमित्र

हॉर्नबिल हा अद्वितीय आणि करिश्माई पक्ष्यांचा समूह आहे जो त्यांच्या विशिष्ट चोचीसाठी आणि त्यातून बाहेर पडणाऱ्या शिंगासाठी ओळखला जातो. हे पक्षी उष्णकटिबंधीय आशिया आणि उप-सहारा आफ्रिकेत मुख्यतः हा आढळतात. जगामध्ये हॉर्नबिल्सच्या एकूण ५७ प्रजाती अस्तित्वात आहेत, ज्यात आशिया खंडातील ३२ आणि आफ्रिका खंडातील २५ प्रजातींचा समावेश आहेत.हॉर्नबिल्सची सर्वात मोठी विविधता उष्णकटिबंधीय अश्या आशिया खंडात आढळते.

भारतात हॉर्नबिलच्या एकूण ९ प्रजाती आढळतात, ज्यामध्ये ग्रेट इंडियन हॉर्नबिल, रुफोस नेक हॉर्नबिल, व्रीथेर्द हॉर्नबिल,ओरिएल पाईड हॉर्नबिल, ऑस्तेंस ब्रोवून हॉर्नबिल, मलबार ग्रे हॉर्नबिल, इंडियन ग्रे हॉर्नबिल, मलबार पाईड हॉर्नबिल आणि नारकोंडम हॉर्नबिल या प्रजातीचा समावेश आहे. विशेष म्हणजे नारकोंडम हॉर्नबिल ज्यांची संख्या खूपच कमी आहे आणि ते फक्त अंदमान आणि निकोबार बेटांच्या नारकोंडम बेटावरच आढळतात. महाराष्ट्रात यापैकी जवळपास ४ प्रजाती हॉर्नबिलच्या पाहायला मिळतात, ज्यामध्ये ग्रेट इंडियन हॉर्नबिल, मलबार ग्रे हॉर्नबिल, इंडियन ग्रे हॉर्नबिल आणि मलबार पाईड हॉर्नबिल. परंतु मध्य भारतातील प्रदेशात मात्र दोनच प्रजाती आढळतात त्या आहेत मलबार पाईड हॉर्नबिल आणि इंडियन ग्रे हॉर्नबिल.

गेल्या १६ वर्षातील हॉर्नबिल संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून मलबार पाईड हॉर्नबिल आणि इंडियन ग्रे हॉर्नबिल प्रजातींबद्दल जरा अधिकच जाणून घेता आले. सध्या मध्य प्रदेशातील पेंच व्याघ्र प्रकल्पात माझे संशोधन प्रकल्पाचे काम सुरु आहे आणि त्यातूनच काही बाबी या हॉर्नबिल प्रजातींबद्दल आमच्या निदर्शनात आल्यात आणि त्या इथे मांडण्याचा छोटासा प्रयत्न.

मलबार पाईड हॉर्नबिल (अँथ्राकोसेरोस कोरोनाटस) ही भारतीय उपखंडात आढळणाऱ्या हॉर्नबिल्सच्या नऊ प्रजातींपैकी एक आहे. IUCN रेड लिस्ट २०२३ नुसार, ही प्रजाती शिकार, जंगलतोड, अधिवास नष्ट होणे, खाण्यायोग्य फळांचा अभाव, प्रजननासाठी मोठ्या झाडांच्या ढोलीचा अभाव ई. बाबींचा परिणाम म्हणूनच हॉर्नबिलची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. याच कारणामुळे मलबार पाईड हॉर्नबिल 'धोकादायक पातळी जवळ' म्हणून सूचीबद्ध झाला आहे.

मलबार पाईड हॉर्नबिल हे पानझडी जंगले आणि विविध वितरण श्रेणींसह घनदाट जंगले पसंत करतात. ही प्रजाती भारतात पश्चिम घाटातील कमी उंचीच्या आर्द्र जंगलात, मध्य भारतातील सातपुडा पर्वतीय जंगले, पूर्व घाट आणि श्रीलंकेतील काही ठिकाणी आढळते. मलबार पाईड हॉर्नबिल तुलनेने लहान आहे, ९२ सें.मी.पेक्षा जास्त मोठे होत नाही. या पक्ष्याचे पांढरे पोट, घशाचा भाग, शेपटीचे टोक आणि पंखांच्या मागच्या कडा वगळता प्रामुख्याने काळे पिसारे असतात. त्यांच्या पिवळ्या आणि काळ्या चोचीला मोठे शिंग असलेल्या टोपीने वेढलेले असते, ज्याला इंग्रजीमध्ये कास्क म्हणतात, मादी पक्ष्याचे डोळे पांढऱ्या त्वचेने वेढलेले असतात जे नरामध्ये दिसत नाहीत, नरामध्ये लाल डोळा काळ्या त्वचेने वेढलेला असतो, मादीचा आकार नरापेक्षा लहान असतो.

मलबार पाईड हॉर्नबिल हे जोडीने किंवा बऱ्याच वेळा गोंगाट करणाऱ्या समूहा मध्ये सुद्धा राहतो. प्रत्येक हॉर्नबिल प्रजातीचा एक विशिष्ट आवाज असतो आणि ती त्या प्रजातीची सर्वात उल्लेखनीय बाब आणि वेगळेपण दाखवणारी असते. मलबार पाईड हॉर्नबिल अधूनमधून ओरडून कर्कश हाक (क्लांग-केंग किंवा काक-काक सारखे आवाज) करतात.

इतर मोठ्या हॉर्नबिल्सच्या तुलनेत त्याचे उड्डाण कमी आहे, परंतु ते फळ असणाऱ्या झाडांच्या शोधात स्थानिक परिसरात सतत स्थलांतर करतात आणि ते चांगल्या खाद्याच्या ठिकाणी किंवा संध्याकाळच्या वेळी रातथाऱ्या च्या जवळ सुकलेल्या उंच झाडावर गोळा होतात आणि जोरजोरात आवाज करतात मात्र रात्रीच्या वेळी ते झाडांच्या पानांमध्ये लपतात आणि वेगवेगळे बसतात व रात्रीला विश्रांती घेतात तसेच रात्रीला बसण्याचे ठिकाण मात्र ते सतत काही दिवसाच्या अंतराने बदलत असतात परंतु बदलेले ठिकाण मात्र जवळच्याच परिसरात असे हे विशेष.

मलबार पाईड हॉर्नबिल हा वनस्पतिजन्य फळ खाणारा पक्षी आहे. त्यांच्या अन्नामध्ये प्रामुख्याने फळांचा समावेश आहे ते आवडते फळ चोचीत उचलतात व घशातील थैलीमध्ये गिळून जमा करतात

यामध्ये वड, पिंपळ, उंबर, पाखड, पाखरी, पुत्रांजीव्ही, जांभूळ, कारी, लोखंडी, टेम्भूर्णी, धावडा , निर्माली, सिंदोली आणि काही लहान फळे इत्यादींचा समावेश असतो. मात्र कधीकधी ते खारुताई, उंदीर, वटवाघुळ, लहान पक्षी, पक्ष्यांचे अंडे, घोरपड,सरडे, साप, बेडूक, शंख आणि विविध प्रकारचे कीटक खातात. विशेष करून प्रजननच्या काळात ढोलीतील मादीला आणि पिल्लांना फळा सोबत प्राणी,पक्षी,अंडे व कीटक या प्रकारचे प्रोटीन युक्त अन्न प्रामुख्याने देतात असे आढळून आले. मध्यप्रदेशातील पेंच व्याघ्र प्रकल्पात मलबार पाईड हॉर्नबिल आणि इंडियन ग्रे हॉर्नबिल या पक्ष्यावर संशोधनाचे काम करीत असताना आम्ही ३९ फळ-वनस्पतीं प्रजातीं आणि ३२ प्रकारच्या प्राणी प्रजातींची नोंद केलेली आहे ज्यांचा वापर ते अन्न म्हणून करतात.

हॉर्नबिल या पक्ष्याला घरट्यासाठी नैसर्गिक आणि सुरक्षित अधिवास आवश्यक असतो. घरटे एका मोठ्या जुन्या झाडाच्या खोडातील ढोलीत सुमारे १० ते १५ मीटर उंचीवर असते. विणीच्या काळात अंडी घालण्याच्या वेळी नर आणि मादी दोघे मिळून घरटे (झाडातील ढोली) शोधतात. त्यांना ती जागा आवडली की, नर आणि मादी त्याच झाडावर किवा जवळच असलेल्या झाडावर एकत्र येतात त्यावेळी नर मादीला तिच्या आवडीचे फळ तिला खाऊ घालतो आणि सतत ते दोघे सोबतच राहतात त्याच दरम्यान त्यांचे मिलन होते. त्यानंतर दोघेही घरट्या जवळ जाऊन साफ सफाईचे काम सुरु करतात, मादी घरट्याच्या आत घुसून ओल्या मातीने लिपण्याचे काम सुरु करते आणि त्यासाठी लागणारी ओली माती नर तिला पुरवायचे काम करीत असतो. हे लिपण्याचे काम काही दिवस चालते आणि ते काम पूर्ण झाल्यावर मादी घरट्यात अंडे देण्याकरिता शिरते, ढोलीचे छिद्र माती,विष्टा आणि फळांच्या लगद्याचे अस्तर घालून बंद करते, ज्यामध्ये एक छिद्र ठेवले जाते, जे इतके छोटे असते कि फक्त मादी तिची चोच त्यातून बाहेर काढू शकते आणि ती स्वतःला जवळ जवळ तीन महिने बंदिस्त करून घेते व पूर्णपणे अन्नासाठी नरवर अवलंबून राहते. मलबार पाईड हॉर्नबिलची मादी १ ते २ पांढरी रंगाची अंडी घालते आणि जवळपास ८८ दिवस घरट्यात राहून सुरवातीला जवळपास २० दिवसात अंडे उबवते आणि नंतर पिलांची व्यवस्थित काळजी घेऊन त्यांना वाढविते.

पिल्लं उडण्या जोगे झाले की मादी ढोलीच्या छिद्रा वरील चोचीने माती काढून पहाटेच्या वेळेला अगोदर स्वतः बाहेर निघते आणि त्यानंतर नर पिल्ला साठी फळ घेवून येतो आणि त्यांना भरवतो व ढोलीतून नराच्या मार्गदर्शनात पिल्ले बाहेर पडतात. अशा प्रकारे जवळ जवळ तीन महिन्याच्या मादीच्या बंदिस्त वासाचे फलित म्हणजे एक किवा दोन पिल्लांना तेथील अधिवासात सोडणे आणि तिथे असणाऱ्या आपल्या प्रजातींच्या संख्येत वाढ करण्याचा प्रयत्न करीत राहणे परंतु बऱ्याच घरट्यातून आम्हला एकच पिल्लू बाहेर पडलेले दिसले आणखी एक गोष्ट आमच्या निदर्शनात आली ती म्हणजे दरवर्षी ती जोडी पूर्वी वापरलेल्याच ढोलीचा वापर करतात. मध्यप्रदेशातील पेंच व्याघ्र प्रकल्पात मलबार पाईड हॉर्नबिल आणि इंडियन ग्रे हॉर्नबिल हे प्रामुख्याने मोह, अर्जुन, गुर्लू, हळदू या वनस्पतीच्या ढोलीत घरटी करतात. विशेषतः सातपुड्यातील पानगळीच्या जंगलात या हॉर्नबिल प्रजातींचा विणीचा हंगाम मार्च ते जुलै असा असतो.

हॉर्नबिल पक्षी प्रजाती गट हा बिज पसरविणाऱ्या पक्ष्यांच्या यादीत येतो आणि त्यांचे नैसर्गिकरीत्या जंगल वाढविण्यात त्याचबरोबर जंगलाचा उत्तम दर्जा टिकवून ठेवण्यात महत्वाचे योगदान आहे ते वड, पिपळ, उंबर,पाखड, पाखडी, पुत्रांजीव्ही,जामुन, चंदन आणि इतर अनेक जंगलातील फळ देणाऱ्या झाडांची बीज पसरवण्याचे काम सतत करीत असतात. या जंगलाच्या व्यवहार्यता आणि आर्थिक सेवांसाठी हॉर्नबिल जंगलातील विद्यमान नैसर्गिक जंगलांच्या पुनरुत्पादनासाठी एक प्रमुख पक्षी प्रजाती गट म्हणून ओळखल्या जातात. म्हणूनच हॉर्नबिल्सच्या लांब अंतरावर बीज स्थलांतरित करण्याच्या अशा क्षमतेमुळेच 'नैसर्गिक जंगल पुनरुत्पादक' व त्यांना 'जंगलाचे शेतकरी' मानले जातात.

भारतातील हॉर्नबिल पक्षी प्रजाती मोठ्या व उंच झाडांच्या खोडातील ढोलीचा घरट्या करिता वापर करतात, त्यामध्ये ते अंडी घालतात आणि जवळ जवळ तीन महिने मादी ढोलीत राहून आणि स्वतःला असुरक्षित ठेवून तिथे आपल्या पिल्लांचे पालनपोषण करते. परंतु गेल्या काही वर्ष्यात आपल्याकडील जंगलाच विस्तार कमी होणे, जंगलातील जुनी आणि उंच झाडांची संख्या कमी होणे, सुरक्षित घरट्यासाठी लागणाऱ्या ढोलीची कमतरता, पर्जन्यमानाची टक्केवारी घटणे, पर्जन्य ऋतूचा कालावधी कमी कमी होणे, वाढते तापमान, जंगलाला सतत लावली जाणारी आग, फळ झाडांचा अभाव, जंगलातील वाढता मानवी हस्तक्षेप, शिवाय पक्षी समुदायांमध्ये, ढोली, अधिवास आणि अन्नासाठी आप-आपसात आणि आंतर-प्रजाती स्पर्धा वाढते आहे यासारख्या अनेक कारणामुळे या प्रजाती करिता लागणारा अधिवास मोठ्या प्रमाणावर नष्ट होत आहेत. त्याच प्रमाणे वाढती लोकसंख्या,घटते जंगलाचे प्रमाण त्यांच्या अस्तित्वावर दबाव आणणारा आणखी एक घटक आहे.भारतातील मोठ्या आकाराच्या हॉर्नबिल प्रजाती आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.सध्या हॉर्नबिल प्रजाती लहान-मोठ्या वनक्षेत्रात टिकून आहेत आणि अशा वातावरणात

मानवी पर्यावरण विरोधी कृतीमुळे हॉर्नबिलची संख्या जास्त काळ टिकू शकणार नाही म्हणून हॉर्नबिल्स आणि त्यांचे अधिवास वाचविण्या करिता, एक योग्य संवर्धन करण्याची गरज आहे आणि त्याकरिता एक व्यवस्थापन योजना तात्काळ बनवणे आवश्यक आहे.वाघाला जसा भारतीय जंगलाचा आत्मा मानला जातो, त्याचप्रमाणे आता या हॉर्नबिल प्रजातीला भारतीय जंगलातील नदी परिसंस्थेचा आत्मा मानला जावा. आपण सर्व हॉर्नबिल प्रजातींना वाचविण्यासाठी एकत्र येऊया, त्यांच्या करिता वड, पिंपळ, उंबर, पाखड, पाखरी, पुत्रांजीव्ही, जांभूळ, कारी, कसई, लोखंडी, टेम्भूर्णी, धावडा, निर्माली, सिंदोली इत्यादि तसेच त्यांच्या घरट्या करिता अर्जुन, मोहा, काटेसावर, हलदू, गुर्लू, कडुलिंब इत्यादि अशा देशी वृक्ष्यांची लागवड करूया आणि आपले गाव,जंगले अधिक समृद्ध करूया.

मध्यप्रदेशातील पेंच व्याघ्र प्रकल्पात सुरु असलेल्या मलबार पाईड हॉर्नबिल आणि इंडियन ग्रे हॉर्नबिल या पक्ष्यावरील संशोधन प्रकल्पाचाच एक भाग म्हणून चला धनेशमित्र बनूया, धनेश वाचवूया, जंगल वाचवूया, पर्यावरण वाचवूया अश्या प्रकारची माहिती पत्रके इंग्रजी, हिंदी आणि मराठी भाषेत तयार करून जंगलाच्या सभोवती असलेल्या गावात स्थानिक लोकांना, विध्यार्थ्यांना आणि पक्षिमित्राना त्याचे वाटप केल्या जात आहे. मध्यभारतातील धनेश प्रजाती संवर्धनासाठी टाकलेले हे एक पाऊल .




*****



आगामी ३७ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन येत्या डिसेंबर दरम्यान शेवगाव जिल्हा अहमदनगर येथे होणार आहे. या दृष्टीने शेवगाव येथील न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे संयुक्त सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंडे, श्री. बापूसाहेब भोसले, प्रा.डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, प्राध्यापक वृंद तसेच महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे अध्यक्ष डॉ जयंत वडतकर, कार्यवाह डॉ. गजानन वाघ, सौरभ जवंजाळ उपस्थित होते.

# पर्यावरण रक्षणाचा कर्म यज्ञ : महिलांचा सहभाग



**डॉ. शुभदा राठी लोहिया**
९४२२७४४८४४

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ।।
कर्म ब्रम्होद्भवं विद्धि ब्रम्हाक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं ब्रम्ह नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ।।

सम्पूर्ण प्राणी सृष्टीची उत्पत्ती अन्नापासून होते. अन्नाची निर्मिती पर्जन्यापासून होते, यज्ञामुळे पर्जन्य होते, कर्मामुळे यज्ञ होते. ऋग्वेदात यज्ञ म्हणजे श्रेष्ठ कर्म असा उल्लेख आहे. त्यामुळे सातत्याने श्रेष्ठ कर्म म्हणजेच योग्य कर्मे करण्याने पर्जन्य पडते. प्रकृती म्हणजेच निसर्गापासून कर्म निर्माण होते. प्रकृतीत ब्रम्ह सामावलेले आहे. असे हे व्यापक ब्रम्ह पुनश्च कर्मात भरले आहे. थोडक्यात याचा अर्थ असा आहे की, प्रकृतीशी निगडीत कर्म सातत्याने जेथे केले जाते, तेथे ब्रम्ह स्थापित असतो. हे कर्मरूपी यज्ञ म्हणजेच पर्यावरण रक्षण होय. या यज्ञात महिला नेहमीच आघाडीवर होत्या, आहेत. गेल्या काही शतकात मानव स्वतःच्या सुखासाठी पर्यावरणाला सतत बाधा पोचवीत आहे. पर्यावरणाची हानी होत आहे. माणसाच्या वाढत्या गरजांमुळे दिवसेंदिवस जंगल तोड, नद्यांचे प्रदूषण, जमिनीचे प्रदूषण, प्लास्टिकचे वाढते दुष्परिणाम यामुळे प्रकृतीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळेच पर्यावरण रक्षणासाठी वेगवेगळ्या पातळीवर अनेक जण कार्य करीत आहेत. यामध्ये महिलांनी देखील वेळोवेळी आपला सहभाग मोठ्या प्रमाणात नोंदवला आहे.

१७३० चे साल राजस्थानच्या पर्यावरण चळवळीत कायमचे नोंदवले गेले ते खेजडली येथील बिष्णोई समाजाच्या अमृतादेवींमुळे. जोधपूर जवळील या गावाजवळ असलेल्या जंगलातील झाडे मोठ्या प्रमाणात तोडण्याचे आदेश महाराजा अभयसिंह यांनी मेहरानगढ येथे राजमहाल बांधण्यासाठी दिले. त्यावेळी बिष्णोई लोकांनी या वृक्षतोडीस विरोध केला. अमृतादेवी या महिलेने जंगलातील तिच्या साथीदारांसोबत झाडांना कवटाळून धरले. 'सर सांटे रुख रहे, तो भी सस्ता जाण' आमचे शिरस्त्राण झाले तरी बेहतर, ते या झाडांपेक्षा स्वस्तच म्हणावे असे म्हणत लोकांनी झाडांना कवटाळले. अमृतादेवी यांच्या पुढाकाराने सुरु झालेल्या या चळवळीत ३६३ लोकांनी आपले जीव गमावले. हे वृत्त राजापर्यंत पोचले तेव्हा राजाला वृक्षतोडीचा आदेश मागे घ्यावा लागला. परिणामी चिपको आंदोलनाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

या चळवळीनंतर साधारण २५० वर्षांनी पुनश्च एकदा उत्तर प्रदेश, आजचे उत्तराखंड येथे १९७४ दरम्यान चिपको आंदोलन झाले. चमोली जिल्ह्यातील रेणा गावी शासनाला जंगलातील झाडे तोडायची होती. गावातील लोकांनी एकजुटीने यास विरोध केला होता. यावर उपाय म्हणून गावातील पुरुषांना अनुदान घेण्याच्या निमित्त्याने जिल्ह्याच्या गावी बोलावले गेले. गावात एकही पुरुष नसल्याने आता आपल्याला जंगलातील झाडे तोडता येतील या अपेक्षेने शासनाने झाडे तोडण्यास एक तुकडी पाठवली. गावातील महिलांनी एकजुटीने गौरादेवी यांच्या नेतृत्त्वाखाली झाडांना कवटाळले. यात लहान मुले देखील सामिल झाली होती. एकही महिला तेथून हटली नाही. गौरादेवी व त्याच्या सर्व टीमच्या मजबुतीने शासनाला झाडे तोडण्यापासून परावृत्त व्हावे लागले. 'क्या है जंगल के उपकार ? मिट्टी पाणी और बयार, मिट्टी पाणी और बयार, जिंदा रहने के आधार' अशा घोषणा देत लोकांनी झाडे तोडण्यास विरोध केला. या चळवळीत सुंदरलाल बहुगुणा, गोविंदसिंह रावत या राजकीय नेत्यांनी देखील साथ दिली. शासनाने त्यानंतर संपूर्ण राज्यात १० वर्षांसाठी जंगलातील वृक्षतोड थांबविण्याचे आदेश तात्काळ काढले. याच प्रकारचे आंदोलन त्यानंतर ३ वर्षांनी १९७७ मध्ये बचनीदेवी यांनी उत्तर प्रदेशातील अडवाणी या गावी केले. हळूहळू हे आंदोलन देशभर पसरले.

गौरादेवी व बचनीदेवी यांनी केलेल्या कामामुळे चिपको आंदोलनाची चळवळ भारतभर पोहोचली. त्यामुळेच उत्तर कर्नाटकात १९८३मध्ये 'अप्पिको चळवळ' सुरु झाली. अप्पिको म्हणजे 'मिठी मारणे'. 'उबसु, बेलेसु, बालासु' असे म्हणत लोकांनी झाडांना मिठी मारून हे आंदोलन केले. 'वाचवा, वाढवा, योग्य वापर करा' असा संदेश लोकांपर्यंत पोहोचवत जंगल वाचवण्याचे काम करण्यात आले.

१९८५ मध्ये हिमाचल प्रदेश मधील सिरमौट जिल्ह्यात चुनखडीच्या खाणी खोदण्याचे काम चालू होते. या खाणी खोदण्याच्या कामास किन्नरीदेवी यांनी विरोध केला . त्यांचे म्हणणे होते की खाणी खोदकामामुळे पाणी प्रदूषित होते आहे, शेत जमीनीचा पोत खालावत आहे, जंगल नष्ट होते आहे त्यामुळे हे काम ताबडतोब थांबविण्यात यावे. शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले.

किन्नारीदेवी उपोषणाला बसल्या. त्यांनी शिमला येथील उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. अक्षरही लिहिता वाचता न येणाऱ्या किन्नरीदेवीना निसर्ग वाचाविण्याचे भान होते. त्यामुळे त्यांनी हा खटला दाखल केला. त्या खटल्याचा निकाल त्यांच्या बाजूने लागला. चुनखडीच्या खाणीचे खोदकाम थांबले. हिमाचल प्रदेशातील पाणी प्रदूषण होण्यापासून, शेत जमिनीचा दर्जा खालावण्यापासून व जंगल कमी होण्यापासून रक्षण झाले. या सर्व महिलांनी निसर्ग जाणला होता. निसर्गाने त्यांना इतके समृद्ध शिक्षण दिले होते की, पुढच्या पिढीस त्या उत्तम पर्यावरण देण्यासाठी अत्यंत महत्वाच्या बनल्या.

१९८५च्या दरम्यान मेधा पाटकर यांनी नर्मदा बचाव आंदोलना अंतर्गत धरण ग्रस्त भागातील विस्थापित आदिवासींसाठी काम केले. या आंदोलनाचा जंगल नष्ट होऊ न देणे हा ही एक जोड मुद्दा होता. अलीकडे २००० च्या काळातील म्हणजे विसाव्या शतकाच्या शेवटी व एकविसाव्या शतकाच्या आरंभी अनेक महिलांनी पर्यावरण चळवळीत आपले योगदान दिले आहे. मनेका गांधी यांनी पर्यावरण व वनमंत्री असताना प्राण्याची तस्करी, प्राण्यांचा माणसाच्या करमणुकीसाठी वापर अशा अनेक गोष्टींवर भाष्य करत त्यावर बंधन आणले. चार R - Rescu, Rehabilitation, Release, and Research म्हणजेच 'बचाव, पुनर्वसन, सुटका व संशोधन' चा वापर करत प्राण्यांसाठी एक सामाजिक संघटन उभारले. प्राण्यांसाठी लोकांचे योगदान म्हणजेच 'पीपल फॉर अनिमल्स' ही संस्था सुरु केली. त्यामुळेच आज चित्रपट, सर्कस किंवा कोणत्याही प्रकारच्या उपक्रमांमध्ये होणारा प्राण्यांचा वापर बंद किंवा कमी झाला आहे.

७१ वर्षाच्या वंदना शिवा मूळच्या डेहराडूनच्या रहिवासी आहेत. पर्यावरण विषयाचा अभ्यास करत नकळत पर्यावरण संवर्धनाच्या संघर्षात गुंतल्या. मानवी हक्कासाठी त्या कायम झगडत राहिल्या. कडूलिंब व बासमती याचे जेनेटिकली पुनर्निर्माण करून त्याचे पेटंट जेव्हा अमेरिकेने घेतले तेव्हा त्या विरोधात त्यांनी आवाज उठवला. जेनेटिक बदलाने तयार केलेले अन्नधान्य न वापरता नेहमीच्या पारंपारिक पद्धतीने बनविलेले बियाणे वापरण्यावर त्यांचा भर आहे. याबाबत जन जागृती करून जगभर त्यासाठी कार्य करीत आहेत. दिल्ली येथे कार्यरत असलेल्या सुनिता नारायण या 'डाऊन टू अर्थ' या मासिकाच्या संपादिका आहेत. यांनी पर्यावरण प्रदूषण टाळण्यासाठी विविध माध्यमांनी प्रयत्न केले आहेत. वेळोवेळी त्याविरुद्ध आवाज उठवत, जन जागृती करत प्रदूषण कमी व्हावे यासाठी त्या हातभारलावत आहेत. सर्वेक्षण करून वेगवेगळ्या प्रश्नातील सत्य प्रशासनासमोर मांडत त्यांनी लढा दिला आहे. त्यांच्या सेंटर फॉर एनव्हायरॉनमेंट एज्युकेशन या संस्थेच्या माध्यमाने चालू असलेल्या कामासाठी २००५ साली त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

कर्नाटक मधील ११२ वर्षाच्या सालुमार्दा थिमाक्का या एक कामगार महिला आहेत. आपल्या गावाजवळ म्हणजे मागडी तालुक येथे त्यांनी वडाची झाडे लावायला सुरुवात केली. पहिल्या वर्षी दहा झाडे, नंतर दर वर्षी पाच किंवा दहा झाडे लावायची व नियमित पाणी टाकून ती वाढवायची असे सतत २०१९ सालापर्यंत केले. आज त्यांनी लावलेली ३९५ वडाची झाडे त्यांच्या गावाच्या आसपासच्या ४५ किलोमीटरच्या राष्ट्रीय महामार्गावर आहेत. ही झाडे कदाचित महामार्ग तयार करताना जाण्याची शक्यता निर्माण झाली तेव्हा त्यांनी शासनाला त्याबद्दल कळवून विनंती केली. त्यामुळे महामार्गात आवश्यक तो बदल करून ती झाडे संरक्षित करण्यात आली. या व्यतिरिक्त एकूण ८००० झाडे लावण्यात त्यांनी त्यांच्या पतींना हातभार लावला आहे. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील कोंभाळणे गावातील राहीबाई पोपरे यांनी पारंपारिक बियाणे जपून देशी वाणांच्या बियाणांचे संवर्धन केले आहे. हायब्रीड बियाणांमुळे आपला नातू आजारी पडतो आहे हे लक्षात आल्यावर विविध प्रकारच्या बियांचे संकलन करून देशी बियाणे टिकवून ठेवणे व सेंद्रिय शेती करणे यावर भर दिला आहे. त्यांनी रान भाज्यांच्या बियाण्यांची पतपेढी तयार केली आहे. त्यांच्या या पर्यावरण समृद्धीसाठी उचलण्यात आलेल्या कार्यासाठी त्यांना २०२० साली पद्मश्री प्रदान करण्यात आले. कर्नाटक येथील होणाली गावातील हलक्की समाजाच्या आदिवासी महिला तुलसी गौडा या वन विभागातील नर्सरीत काम करत असताना त्यांना झाडांची व बियांची जवळून ओळख झाली. झाडांची मूळ प्रजाती ओळखण्यात त्यांचा हात कुणी धरू शकत नाही म्हणूनच 'वन विश्वकोश' या नावाने त्यांची ओळख आहे. यांनी ३०००० झाडे लावत पर्यावरण संवर्धन करण्यात हातभार लावला आहे. त्यासाठी त्यांना २०२१ या सालचे 'पद्मश्री' प्रदान करण्यात आले आहे. 'लेडी टारझन' नावाने ओळखल्या जाणाऱ्या जमुना टूडू या झारखंड येथील महिला आहेत. त्यांनी १९९० मध्ये एक संघटन बनवले, ज्याचे नाव आहे 'वन सुरक्षा समिती'. या समितीच्या माध्यमाने त्यांनी जंगलात गस्त ठेवण्यास सुरुवात केली व बेकायदेशीर खाणी खोदणे अगर लाकडे तोडणे यावर पाळत ठेवली व जंगलांचे रक्षण केले. सुमेरा अब्दुलाली या महाराष्ट्रातील मुंबई येथे आवाज फौंडेशनच्या माध्यमातून काम करतात. कचऱ्याचे नियोजन, ध्वनी प्रदूषण, हवा प्रदूषण व सागरी किनाऱ्याचे संवर्धन यासाठी काम केले आहे. ब्रम्हपुत्रा काठच्या गोहाटीजवळ असलेल्या दादरा (आसाम) येथील ४१ वर्षीय पौर्णिमा देवी यांनी 'हर्गीला आर्मी' हा उपक्रमात सुरु केला. मोठा सहायक

करकोचा या पक्ष्याचे संवर्धन करण्यासाठी त्यांचा अधिवास म्हणजे मोठी झाडे वाढविण्याचे काम केले आहे. जखमी करकोच्यांची सुश्रुषा करून बचाव कार्यातही त्यांचा मोठा वाटा आहे. तसेच झाडावरून खाली पडण्याने पिल्ले जखमी होण्याचे प्रमाण जास्त असते. त्यासाठी झाडाखाली जाळी, साडी अगर दुपट्टा लावून झाडावरून पडणाऱ्या पक्ष्यांना वाचविण्याचे कामही त्या गावात उत्तमरीत्या केले जाते. ३८ वर्षीय डॉ. अर्चना शुक्ला या शिक्षिका असून मध्य प्रदेश येथील सतना गावात शासकीय माध्यमिक शाळेत शिकवतात. त्यांनी गेल्या ११ वर्षात अनेकांना पक्ष्यांची घरटी बनविण्याचे प्रशिक्षण दिले आहे. त्या सोबतच स्वतः २०० पेक्षा अधिक घरटी बनवून चिमणी संरक्षणासाठी काम करीत आहेत. वरवर जरी या मोहिमेला चिमणी संरक्षण म्हटले जात असले तरी त्या आकाराच्या सर्वच पक्ष्यांना या घरट्यांचा उपयोग होतो. काश्मीरच्या श्रीनगर येथील आलिया मीर ही महिला 'वाईल्ड लाईफ एस ओ एस' या संस्थेत स्वयंसेवक म्हणून काम करीत असे. हे काम करत असताना काश्मीर मधील जखमी तपकिरी अस्वल, काळे अस्वल, साप यांची सुटका करून पुनश्च जंगलात सोडण्याचे काम त्या करतात. २०२१ मध्ये त्यांनी 'वन्य जीव बचाव' ही हेल्प लाईन सुरु केली आहे. यासाठी त्यांना पुरस्कृत देखील करण्यात आले आहे. खरेतर अशा अजूनही अनेक महिला असतील ज्यांनी या कर्मयज्ञात स्वतःचा सहभाग नोंदवला आहे. त्या सर्वांचीच नोंद घेतली गेली नसेलही कदाचित. पण अशा अनेक महिला सातत्याने पर्यावरण संवर्धनात आपले योगदान देत आहेत, देत राहतील. हे कर्म यज्ञ असेच चालू राहणार.

****



महाराष्ट्र पक्षिमित्रचा जीवन गौरव पुरस्कार (२०२३) आदरणीय श्री. दिगंबर गाडगीळ सर यांना जाहीर झाला होता. सांगली येथे पार पडलेल्या संमेलनात श्री. गाडगीळ सरांना उपस्थित राहता आले नाही. त्यामुळे हा पुरस्कार दि. १६ मे रोजी पुणे येथे प्रदान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र पक्षीमित्रचे सल्लागार श्रीमान बापूसाहेब भोसले, म.प.चे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, प्रा.डॉ. गजानन वाघ (कार्यवाह), सौरभ जवंजाळ व ॲड. राजमेहर निशाने यांची उपस्थिती होती.

# नदीसुरय



**माणिक पुरी**
परभणी
मो.९८८१९६७३४६

मी तळ्याकाठी येऊन बसलो. नदीसुरय पक्ष्यांनी नुसता धुडगूस घातलेला. ही पाखरं एवढा कर्कश आवाज का बरं करत असावीत ? जेवढी पाखरं काठालगत बसून काहीतरी टिपत होती त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त पाखरं तळ्याच्या पाण्यावर पंख फडफड करत थांबल्यासारखी दिसायची. काही पाखरं पाण्यात सूर मारायची. मनाला विरंगुळा व्हावा म्हणून तळ्याकाठी आलो होतो. पण नदीसुरयच्या आवाजानं इथं बसणं सुद्धा अवघड झालंय. मी स्वतःवरच चिडचिड करत राहिलो. ज्या पावलानं तळ्याकडं आलो त्याच पावलानं माघारी वळालो. घरी आल्यावर जरासं बरं वाटलं. भिंतीला पाठ टेकवून बसलो की, नदीसुरयचा आवाज येऊ लागला. बाहेर डोकावलो. घरासमोरील पिंपळाची पानं तेवढी सारखी हालताना दिसली. इथं कुठं नदीसुरय ? घरी येताना सोबत या पक्ष्यांचा आवाजही घेऊन आलो होतो हे कळायला उशीर लागला नाही.

पहाटेच्या वेळीचा पळसमैनेचा चक् – चक् आवाज. तळ्याच्या पाण्याचा चुबुक् – चुबुक् आवाज. खंड्याची किली– लिली. रातव्याचा चक्–चक्–चकर् आवाज. पाणकावळ्यांचा आह् आह् – कोक् कोक् आवाज. घरासमोरील चिमण्या – कावळ्यांच्या आवाजाविषयी सांगायची गरजच नाही. हे सगळे आवाज अनेकदा ऐकले. पण या आवाजानं कधीच पिच्छा पुरविला नाही. मग आजच या नदीसुरयच्या आवाजनं मी एवढा अस्वस्थ का होतोय ? काही कळत नव्हतं.

घरी अस्वस्थ होतंय म्हणून तळ्याकाठी गेलो. तिथं गेल्यावर पिवळ्या चोचीच्या पक्ष्यानं अस्वस्थ करून सोडलं. त्याचं काळं डोकं पहावसं वाटत नाही. त्याच्या तांबड्या पायाची घृणा वाटायला लागली. दिसायला कबुतराएवढा पक्षी. पण आवाज किती कर्कश. पुन्हा – पुन्हा या पाखरांना का आठवू पाहतोय ? जणू रामकाठी बाभळीसारखा सडपातळ बांध्याचा नदीसुरय ..

मी समजत होतो की, फक्त नदीसुरयचा आवाजच माझ्यासोबत आला. पण तसं नव्हतच मुळी !

बस ! या पाखराविषयी विचारही करायचा नाही. त्याचा आवाजही समजून घ्यायचा नाही. त्याचं रंग – रूप सुद्धा आठवायचं नाही. आज तळ्याकाठी गेलो होतो हे सुद्धा विसरून जायचं असं मनाशी पक्कं ठरविलं.

पुस्तकाचं कपाट उघडलं. 'महाश्वेता देवी' यांची 'इतवा मुंडाने लढाई जिंकली' ही कथा वाचू लागलो. इतवाची कहाणी संपली तेव्हा इतवा नदीकाठी होता. रेतीत उताणा पडून आभाळाशी बोलू लागला. त्याच्या आजूबाजूला नदी, आकाश, गवत सारं काही आनंदात होतं.

कथा वाचली तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. घरासमोरील पिंपळाच्या झाडाखाली आलो. पानांची सळसळ खूप कमी झालेली. झाडाला पाठ टेकवून बसलो. घरात भिंतीला पाठ टेकवून बसलो तेव्हा नदीसुराचा आवाज आला होता. तेव्हा या झाडाकडं पाहिलं होतं. तो पाणपक्षी इथे दिसणार नव्हता तरीसुद्धा डोकावलो होतोच !

तळ्याकाठी नदीसुरयच्या आवाजनं मी अस्वस्थ होत होतो. पण त्याची पिवळी चोच, काळं डोकं, तांबडे पाय हे सारं पुन्हा – पुन्हा आठवतय. माझ्या अस्वस्थ होण्याचं कारण काहीतरी वेगळंच होतं. नदीसुरयच्या आवाजाचा अर्थ मला कळत नव्हता हे एक कारण असू शकतं. त्यांच्या आवाजानं माझा पिच्छा पुरविला होता. आता मी त्यांचा पिच्छा पुरविणार होतो. त्यांची गुपितं समजून घेणार होतो. त्यांचा आवाज ऐकण्यासाठी पुन्हा एकदा तळ्याच्या दिशेनं आपोआप वळालो सुद्धा !

काल ज्या जागेवर बसलो होतो अगदी तिथंच पोहोचलो. त्याच जागेवर बसलो. थोडासा खोलगट भाग. लपणासारखी जागा केलेली. मान उंच केली तर डोकं तेवढंच दिसणार होतं. डोक्यावर हॅट घातलेली. त्यामुळे माझा सुगावा लागणार नव्हता हे नक्कीच ! त्यांनी पुन्हा – पुन्हा धुडगूस घातला. कर्कश आवाज. अनेक नदीसुरय तळ्याच्या काठालगत येऊन आवाज काढत. त्या सगळ्यांचा आवाज एकमेकात मिसळून गेलेला. समूहानं उडताना आवाजाची आवृत्ती होत होती. ते उडताना स्थिर नव्हतेच. तशी त्यांच्या आवाजातही स्थिरता नव्हती.

ती सगळी एकाच प्रजातीतील पाखरं एकमेकांशी संवाद साधत होती. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीचं हे चित्र आवाजासह मनावर कोरलं गेलं. कधी एकमेकांचा पाठलाग करत. तर कधी माशावर ताव मारण्यासाठी बुडी घेत. 'कवड्या खंड्या' जसा सूर मारतो तशीच सूर मारण्याची कला नदीसुरयने आत्मसात केलेली. पाण्यावर स्थिर होत माशाचा वेध घ्यायचे. कधी – कधी पाण्यात दगड पडावा तसा धपकन् आवाज यायचा. तिकडं वळून पाहिलं की, नदीसुरय मासा पकडून उडताना दिसे. पकडलेला मासा चोच वर करून हवेतल्या हवेत गिळून घेत. पुन्हा त्यांच्या आवाजाची वलयं माझ्यापर्यंत येऊन पोहचत.

आता त्यांच्या आवाजातला कर्कशपणा कमी जाणवत होता. ते एकमेकांशी बोलताना दिसू लागले. अधून – मधून एकमेकांना लहान आकाराचा मासा भरवू लागले. त्यातून त्यांची प्रेमाची भावना कळू लागली. एकमेकांचा पाठलाग करत. जोडीनं फिरत असत. पाण्याजवळून उडताना दिसू लागले. कधी – कधी त्यांचा स्पर्श पाण्याला होई. तेव्हा पाण्याची वलयं काठाकडं सरकताना दिसत. अविरतपणे पंखांची फडफड करत. तळ्यावरून विहार करू लागले. त्यांच्या कसरती पाहण्यातच दुपार झालेली. गिरकी घेऊन मान झुकवून पाण्याला न्याहाळणारी ही पाखरं कधी माझ्याजवळ येऊन बसलीत कळालं सुद्धा नाही. पंखांना थोडासा विसावा मिळावा म्हणून काही नदीसुरय काठालगत येऊन बसले. ज्यांच्या जोड्या जुळून आल्या ती पाखरं बिलगून बसलेली दिसली.

या पाखरांना जवळून पाहता आलं. काल फक्त त्यांचं काळ डोकं दिसलेलं. आज त्यांचा माथा सुद्धा काळ्या रंगाचाच दिसला. मानेकडील उतारावरची जागाही काळ्या पिसांनी झाकलेली दिसू लागली. माथा, डोकं आणि मानेचा अर्धा भाग काळ्या रंगानं चितारलेला. काळ्या मण्यासारखे दिसणारे डोळेसुद्धा काळेच ! काळ्या रंगात अधिकचा चमकदारपणा जाणवू लागला. काळा रंग फारसा कुणाला आवडत नाही. पण या रंगानं नदीसुरयचं सौंदर्य अधिकच खुललेलं पाहता आलं याचा आनंद मला झालेला. काल ज्यांच्या आवाजामुळं अस्वस्थ झालो होतो. आज तीच पाखरं समोर बोलत बसलेली. आता ती एकटी – एकटी बोलत होती. समूहात असतानाचा त्यांच्या आवाजातील सर – मिसळपणा निघून गेलेला. जणू ती आपली गुपितं एकमेकांना उलगडून दाखवीत आहेत असंच वाटायचं.

मी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात जरा जास्तच डोकावतोय असं माझंच मला वाटू लागलं.

एक नदीसुरय पुढ्यात पाठमोरा बसला. कोतवाल पक्ष्यासारखी त्याची दुभंगलेली शेपटी दिसली. त्यांच्या हवेतल्या कसरती पाहताना शेपटी ठळकपणे ओळखू येऊ लागली. दुभंगलेली शेपटी डावीकडे – उजवीकडे झुकवित ही पाखरं वेगवेगळी वळणं घेताना दिसली. पुढ्यातला नदीसुरय पाण्याकडं झेपावला. तेव्हा त्याच्या रंगाची कल्पना आली. अंगावर जसा राखाडी रंग होता तोच रंग त्याच्या शेपटीवरही होता.

त्यांचा आवाज पुन्हा – पुन्हा ऐकू लागलो. जसा टिटवीच्या आवाजातला ' ट ' चा उच्चार जाणवतो. तसा काहीसा ' ट ' सारखाच आवाज यायचा. ' च ' चा उच्चारही ऐकू यायचा. सुरुवातीचा कमी उंचीचा आवाज नंतर उंचावतो आणि शेवटी कमी होतो. अधून – मधून चिर्रर् असाही आवाज ऐकू येई. पहिल्याचा आवाज ऐकण्यापूर्वीच दुसऱ्याचा आवाज कानावर पडे. नंतर तिसऱ्याचा. सुरुवात आणि शेवट संपायचीच नाही. त्यांच्या आवाजाची मालिका ऐकतच घरी परतलो.

नदीसुरयला 'टिलवा' सुद्धा म्हणतात. त्याच्या आवाजावरूनच टिलवा नाव मिळालं असावं. कोरकू लोक ' जुगी ठिटिईण ' म्हणतात. या नावातला 'ठिटिईण' हा उच्चार या पाखरांच्या आवाजाशी साम्य पावतो. पक्षीतज्ञ 'मारुती चितमपल्ली' यांच्या 'पक्षीकोश' ग्रंथात या पाखराचं 'नदी कुररी' हे एक नाव वाचायला मिळालं. त्यांच्या आवाजाचा आणि नावाचा सहसंबंध मी लावू पाहतोय एवढंच !

नदीसुरयच्या आवाजाची लय पुन्हा – पुन्हा आठवीत होतो. त्यातील एखादी लकेर सापडते का ? याचा शोध घेत होतो.' सुभग' पक्ष्यासारखं त्याचं गाणं तर नसावं ? गाणं म्हटलं की आलाप–विलाप आलाच ! पण तसं काही नदीसुरयच्या आवाजात नव्हतं. जरी तो यावेळी प्रणयोत्सुक असला तरी त्याच्या आवाजातील गोडवा इतर पक्ष्यांच्या आवाजासारखा नव्हता हे सुद्धा खरंय ! पण त्यांची साद घालण्याची पद्धत मला फारच आवडली.

सूर्योदय झाला आणि मी तळ्याच्या काठावर पोहोचलो. तळ्याच्या आत एक लहानसं बेट होतं. तिथं झाडं नव्हतीच. खुरटं गवत तेवढं वाढलेलं दिसू लागलं. लहान – लहान दगडगोटे अस्ताव्यस्तपणे पडलेले. त्याच बेटावर नदीसुरयच्या आवाजानं जागा धरून ठेवलेली. तिथं त्यांचा 'ठिटिईण' सारखा आवाज सुरूच होता. त्या आवाजानं बेट भारून गेलेलं. कितीतरी मादा पक्ष्यांनी जमिनीवर जागा मिळविलेली. नदीसुरय नर आजूबाजूलाच उडताना दिसू लागले. काही पक्ष्यांनी माझ्यापर्यंतचं अंतर कमी केलेलं. तसा त्यांचा आवाज अंगावर झेप घेऊ लागला. मी मात्र डोळ्याला दुर्बिण लावून तेथील विणीचा काळ टिपत होतो.

जर कोणी मला विचारलं की, नदीसुरयच्या आवाजाचा रंग कोणता ? तर माझं उत्तर 'काळा रंग' असंच राहील. 'चाष' पक्ष्याच्या विणीच्या काळातील आवाज आणि नदीसुरयचा याच काळातील आवाज सारखाच वाटतो. वेगवेगळ्या कुळात जन्मलेली ही पाखरं. पण त्यांच्या आवाजाच्या रंगाविषयी एकरूपता आढळून येते हे सुद्धा न उलगडणारं कोडच म्हणावं लागेल !

पहिल्या दिवशी तळ्याकाठी पोहचलो तेव्हा या पाखरांचा आवाज ऐकून काहीतरी अपशकुन घडतय असंही वाटलं होतं. त्यांच्या आवाजातली भीती जणू तळ्याच्या पाण्यावर पसरलेली होती. पण आता तसं काहीच जाणवत नव्हतं.

माझ्या दिशेनं आलेले नदीसुरय पाण्यालगत उतरले. काहींचे तांबडे पाय पाण्यात होते. सर्वजण एकापाठोपाठ एक उभे असल्यासारखे

जाणवत होते. यावेळी त्यांचा आवाज कुठे दूर देशी पळून गेला होता. क्षणभर वाटलं ही सगळी पाखरं म्हणजे नदीसुरयच आहेत का ? सगळ्यांच्या माना सरळ. पिवळी चोच जमिनीला समांतर. पाण्यावर पंख फडफड करीत तरंगतही नव्हते. फक्त बेटाच्या परिसरात त्यांच्या आवाजाची स्पर्धा सुरू होती. इथं तर मूक संवाद चाललेला. यापूर्वी या पाखरांना एवढं शांत बसलेलं कधी पाहिल्याचं आठवत नाही. ठिटिईण आवाजाची पुनरावृत्ती करावी म्हणून मी वाट पाहत होतो.

बेटाच्या दिशेनं दुर्बिण फिरविली. अजूनही मादा नदीसुरय अंड्यावर बसलेल्या होत्या. एका मादीने तीन दगडाच्या अगदी जवळच घरटं तयार केलेलं. मातीवरच अंडी दिलेली. त्या अंड्यांचं संरक्षण करण्यात ही सगळी पाखरं गुंतली होती. बेटावर अंडी दिल्यानं अर्धे संरक्षण मिळालेलच होतं. उर्वरित संरक्षणाची जबाबदारी दोघांनीही उचललेली होती.

त्या बेटावर फक्त नदीसुरय पक्ष्यांचीच घरटी दिसू लागली. 'शेकाट्या' पाणपक्षी सुद्धा पाण्यालगत किंवा लहानशा बेटावर घरटी बनवितात. पण या बेटाचा आकार मोठा असूनही फक्त नदीसुरय पक्ष्यांनीच तिथं संसार थाटलेला दिसू लागला. खरं तर तिथं शेकाट्या पक्ष्यांची सुद्धा घरटी असायला हवी होती. पण तसं का घडलं नसावं याचं कुतूहलही वाटत होतं. मी त्या बेटाला 'नदीसुरयचं बेट' म्हणून ओळखू लागलो.

त्यांच्या आवाजापासून सुरू झालेला प्रवास या बेटापर्यंत येऊन पोहोचला होता. 'ट' आणि 'च' पासून 'चिव् चीटर्र, छिर्र – छिट' असा आवाज ऐकू येऊ लागला. तोच आवाज असूनही त्यातील काहीसं वेगळेपण जाणवत होतं. तळ्याच्या काठालगत त्यांच्या जोड्या जुळलेल्या. एकमेकांना खाऊ घालत. तेव्हा एकमेकाबद्दल असणारी ओढ आणि संवाद साधण्याची भाषा याविषयीचे निरीक्षण इथं फारसं उपयोगी पडत नव्हतं.

काही घरट्यात तीन तर काही घरट्यात दोन अंडी दिसू लागली. कितीतरी घरटी आणि त्यात कितीतरी अंडी पाहून आता ते 'अंड्यांचं बेट' वाटू लागलं. नदीसुरय अंड्यावर बसलेली. अंड्यांचं तापमान नियंत्रित करण्यासाठी पोटाचा भाग ओला करण्यासाठी पाण्यात उतरत. पुन्हा अंड्यावर येऊन बसत. एकाचं अंड्यावर बसणं आणि दुसऱ्याचं पोटाचा भाग ओला करण्यासाठी पाण्यात उतरणं ही क्रिया कोणताही संवाद न करता घडू लागली. एखादवेळी चिव् चिटर्र आवाज करत. आवाज करणारी पाखरं आता एकमेकांना समजून घेऊ लागली. पोटाचा भाग ओला करून जवळ आलेला जोडीदार पाहिला की, अंड्यावर बसलेला नदीसुरय लगेच जागा सोडायचा. विणीच्या काळातील त्यांचं वागणं समजून घेता येऊ लागलं याचा आनंद होताच! माळरानावरील पक्ष्यांच्या विणीचा काळ अभ्यासण्यासाठी फार भटकंती करावी लागायची. इथं मात्र तसं नव्हतं. तळ्यालगत लपणात बसलं की, समोर नाटक पाहिल्यासारखंच वाटायचं.

समोरच्या नाटकातील दृश्य फारच मनोहर वाटायचं नदीसुरयचं बेट. पाठीमागे तळ्याचा पडदा. बेटावरील दगडगोटे जणू मुद्दाम आणून बसविलेले. नर आणि मादी वेगवेगळे पात्र रंगविताना दिसत. त्यांचा आवाज जणू संगीतच! सकाळ सायंकाळची प्रकाश योजना सूर्यानं करून ठेवलेली. हे नाटक पाहण्यासाठी मी एकटाच प्रेक्षक म्हणून तळ्याकाठी उपस्थित होतो.

तरीसुद्धा त्यांच्या आवाजानं सारखं आकर्षित होत असे. पक्षीअभ्यासक 'विद्याधर म्हैसकर' यांच्याशी या आवाजाविषयी जाणून घ्यायचो. त्यांना उलगडलेला आवाज त्यांनी मला ऐकवला.

चिव–चिटर्र, चिव–चिटर्रर्र
छिर्रर्र छिर्रर्र
छिर्र–छिट्, छिछिर्र–छिछिर्रर्र–छिट

मी पुन्हा एकदा नदीसुरयचा आवाज ऐकण्यासाठी तळ्याकाठी येऊन बसलो. बेटावरील अंड्यातून बाहेर पडलेली पिलं पाहण्यासाठी पाण्यात उतरलो



# गरुड पुराण....

**सौ. सीमा तंगडपल्लीवार**
पक्षी निरीक्षक,नाशिक



बऱ्याच दिवसांत वातावरण ढगाळ असल्याने कुठे पक्षी बघायला जाता आलं नाही पण रविवार असल्याने आणि जरासे वातावरण बरे आहे असे वाटले म्हणून लेकाला म्हटलं सोडून दे मला तर तिथे गेल्यावर अवघ्या काही दोन एक तासाभरातच परत वातावरण बदलले .पण त्या दरम्यान श्री व सौ Great blue heron, नवे तीन चार पिटुकले मित्र,Orange-crowned warbler, Blue-gray gnatcatcher , Ruby-crowned kinglet,Northern shoveler, Cormorants दोन प्रकारचे , Roseate spoonbill , Egrets ,White Ibis with juvenile, American coot , Black bellied whistling duck ,Beaver-Nutria , Great tailed Grackles, Europian starling वगैरे वगैरेंच्या भेटी झाल्यावर जरा चालत पुढे गेले.मध्ये सुंदर स्वच्छ नितळ असा मोठा lake आणि त्याच्या भोवती गर्द हिरव्या झाडीतून डोकावणारा रस्ता..या इथे चालत असताना अनामिक प्रसन्नता वाटते इतकी प्रसन्न सुंदर मोकळ्या आकाशाखाली असलेली ही निसर्गरम्य जागा.चालत असताना एका ठिकाणी नजर खिळली आणि बघते तर चक्क तुती दिसल्या झाडाला , पहिले वाटले नसेल म्हणून दुर्लक्ष केलं पण अगदी चार पावलं जात नाही तोच पुन्हा एका झाडाला पिकलेल्या मोठ्या मोठ्या काळ्या तुती,आधी विश्वासच बसला नाही डोळ्यांवर पण चार डोळे असल्याने अगदीच तसेही म्हणता येत नव्हते. जवळ जाऊन एक तोडून तोंडात टाकली आणि जी काही मिटकी मारली म्हणून सांगू.

आपण अमेरिकेत आहो साफ खोटं काय होईल म्हटलं होऊन होऊन या राजवाड्यात कैद होईल, शिक्षा होईल ..तेच तर हवे आहे.. कैदी व्हायला नक्कीच आवडेल म्हणून दोनचार तोडल्या आणि लेकाला घ्यायला बोलावलं होतं ,त्याला दाखवू म्हणून एका हातात ठेवलेल्या गळ्यात दुर्बीण एका हातात तुती एका खांद्याला कॅमेरा पाठीवर सॅक असा हा माझा भारी जबरदस्त अस्सल भारतीय परदेशी अवतार येणारे जाणारे देशस्थ अमेरिकन कौतुकास्पद बघत होते. छान smile देत होते.आणि एकदम अचानक शांतपणे आपल्या आपल्यात दंग मग्न असलेले तळ्यातल्या झाडांवरील हजारोंच्या संख्येने असलेले कॉर्मोरंट्स आवाज करत सैरभर उडू लागले. दुपारचे चारसाडेचारच वाजलेले होते सूर्यप्रकाश बऱ्यापैकी कमी झालेला. माझ्यातच दंग मग्न असलेली मी पण एकदम हलली आणि असे काय झालं म्हणून जरा नीट डोळे फाडून बघितलं तर काळ्या पांढऱ्या रंगाचे काहीतरी त्यांच्या भोवती घिरट्या घालताना दिसले म्हणून मग दुर्बिणीने बघितलं आणि तोंडाचा आऽऽ झाला पण मला कळलंच नाही की हातातील तुती त्या 'आ' मध्ये कोंबून हात रिकामा करावा आणि दोन्ही हाताने कॅमेरा पकडावा... काय होतंय कळायच्या आत एका हाताने कसेबसे एक दोन क्लीक केले... बावरल्यावर कशी अवस्था होते अगदी तशीच अवस्था झाली होती माझी..

हे राजा महाशय शिकारीसाठी निघाले होते , इतक्या वेगात की काय कळायच्या आत शिकार हाती लागली होती . सूर्यप्रकाश फारच कमी होता तर फोटो म्हणावा तसा आला असता की नाही माहीत नाही. आनंद इतका झाला होता की आपण USA च्या प्रेसिडेंटच्या प्रेसिडेंटला भेटतो आहो की काय असे झालेले , म्हणजे काय ? भेटतच होते. जाऊ द्या फोटो महत्वाचा नाही , स्पष्टपणे कळतंय फोटोत कोण आहे ते.

तर आता ऐका वाचा कोणाला भेटले मी , कोण भेटले मला त्या राजाचे नाव काय वगैरे वगैरे USA चा नॅशनल पक्षी म्हणून ज्याला १६६२ साली घोषित केले त्याला त्या राजाला ज्याचं नाव Bald eagle ला नावात काय आहे म्हणतात ते उगाच नाही म्हणूनच नावावर जाऊ नका.

बाल्ड ईगल हा जगातील सर्वात सुप्रसिद्ध प्रकारच्या गरुडांपैकी एक आहे आणि विशेषतः मी आहे सध्या त्या युनायटेड स्टेट्सचा राष्ट्रीय पक्षी आहे . अवाढव्य असे त्याचे विंग span. दोन बाजूला तपकिरी रंगाचे पंख पसरलेले आणि पुढे मागे शुभ्र पांढरा रंग त्यात टोकदार बाक असलेली पिवळी चोच अशा या नैसर्गिक गर्भश्रीमंती असलेल्या पक्ष्यासोबत माझी अगदी अचानक थोडी का होईना भेट झाली हे महत्वाचे.

लेकाला सांगितलं तर त्याचाही विश्वास बसला नाही पहिल्यांदा पण नंतर कळलं आपली आई जाईल तिथे जाईल तेव्हा काहीतरी करून येतेच. तसेच काहीसे या पक्षीव्यक्तीबद्दल मला झाले.. भेटल्यावर खूप जाणून घेतल, वाचलं आणि खूप काही निरीक्षणातून कळलं .

आता थोडीशी माहिती ह्या विशेष पक्षीव्यक्ती बद्दल मला कळलेली. प्रत्यक्षात हे नाव जुन्या इंग्रजी शब्दापासून आले आहे, बाल्डे, म्हणजे पांढरा.. डोक्याचा भाग पांढऱ्या पिसांचा असतो पण bald म्हणजे मराठीत टक्कल असा अर्थ होतो म्हणून मराठीत टक्कल गरुड असे म्हणतात.. गरुडांच्या डोक्यावर आणि मानेवर पांढरे पिसे असतात म्हणून Bald Eagle आणि त्यांचा पिसारा काळपट तपकिरी असतो. टक्कल गरुड प्रत्यक्षात टकले नसतात. त्याचा डोक्याचा पांढरा रंग त्याच्या तपकिरी शरीराच्या रंगामुळे जास्तच शुभ्र दिसत होता हे प्रत्यक्षात त्याला बघितल्यावर जाणवलं. साधारण वजन सात आठ किलो तरी असेल इतका मोठा होता.

जगभरामध्ये गरुड पक्षाच्या ६० पेक्षा अधिक प्रजाती आढळतात. गरुड हा पक्ष्यांचा राजा म्हणून ओळखला जातो. अतिशय चालाक, बुद्धिमान, वेगवान, विशाल आकार. रहस्यमयी आणि सर्वश्रेष्ठ असा हा पक्षी. भारतीय, सुवर्ण, टक्कल, इबेरियन, बोनेलीचे, हार्पी, ठिपक्यांचा, पाणगरुड, मत्स्य, नेपाळी, पहाडी अशा अनेक प्रजाती आहे .. गरुड श्रेष्ठत्व आणि शक्तीचे प्रतीक आहे. त्यांचे उड्डाण उंच असते आणि त्यांचे डोळे देखील तीक्ष्ण आणि नजर एकदम भेदक असते. त्यांच्याकडे आश्चर्यकारक दृष्टी आहे. ते तीन ते चार किलोमीटर अंतरावरून सुद्धा त्यांची शिकार पाहू शकतात.

१६६२ मध्ये अमेरिकेचा राष्ट्रीय पक्षी म्हणून घोषित केलेला हा पक्षी पूर्णपणे नामशेष होण्याच्या मार्गावर होता, कारण त्यांची शिकार केली जाऊन त्यांच्या पंखांचा वापर सजावटीसाठी केला जात होता. शिवाय पिकांवर केलेल्या डीडीटी फवारणीमुळे होणारी विषबाधा. त्यामुळे आता अमेरिकेने त्यावर अत्यंत

कडक कायदे केलेले आहेत आणि पूर्णपणे त्यांना संरक्षण दिले गेले आहे म्हणून त्यांची संख्या परत वाढत आहे. पक्ष्यासाठी इतका कडक कायदा केलेला त्यासाठी द्यावे तितके धन्यवाद कमीच USA सरकारला आपण सर्वांनी आपापल्या परीने पक्ष्यांचे संरक्षण करावयास हवे. नव्हे केलेच पाहिजे .

हे गरुड पक्षी मादी आणि नर मिळून घरटे बांधतात. घरटे गवत, पिसं आणि काड्यांचे बनलेले असते. काही वेळेला ते खूप मोठे घरटे बनवतात. नुकतेच वाचण्यात आलेलं ,जगातील सर्वात मोठे घरटे फ्लोरिडाजवळ वीस फूट खोल आणि ९ फूट उंच आणि २ टनांपेक्षा जास्त वजनाचे आढळले आहे ज्याची गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे . हा टक्कल गरुड फक्त उत्तर अमेरिकेतच आढळतो

हा सुंदर पक्षी १७८२ पासून युनायटेड स्टेट्सचे राष्ट्रीय चिन्ह आहे. शिकार आणि प्रदूषणामुळे बाल्ड गरुड नामशेष होण्याच्या उंबरठ्यावर होते ,परंतु जवळजवळ ४० वर्षांपूर्वी तयार केलेल्या कायद्यांनी त्यांचे संरक्षण करण्यात मदत केली आहे आणि त्यांनी पुनरागमन केले आहे.

गरुड हा पक्षी शक्ती, स्वातंत्र आणि श्रेष्ठता याचे जिवंत प्रतीक म्हणून पूर्ण जगामध्ये ओळखला जातो. हा एक मोठ्या आकाराचा शिकारी पक्षी आहे . प्रत्यक्षात शिकार पकडताना बघितलं मी ..

प्राचीन संस्कृतीत गरुड किती महत्त्वाचे प्रतीक आहे. आपल्या हिंदू धर्मग्रंथांमध्ये दिसूनच येते त्याचे महत्व. गरुड दिसला म्हणजेच आपल्यासाठी शुभेच्छा आपल्या हिंदू धर्मग्रंथांमध्ये गरुड विष्णूचे वाहन आहे तसेच प्राचीन ग्रंथ गरुड पुराणामध्ये आत्म्याचे रहस्य, स्वर्ग आणि नरक यांचे वर्णन केलेले आहे म्हणून जेव्हा एखादी व्यक्ती आपला इहलोक सोडून जाते तेव्हा त्या घरी गरुड पुराण वाचले जाते . म्हणजे मोक्षप्राप्ती आणि आत्मज्ञानाचे साधन आहे म्हणूनच म्हणजेच आपल्या आत्म्याला बळ देणारा गरुडासारखा शक्तिशाली असा हा ग्रंथ गरुड पुराण .

# या चिमण्यांनो परत फिरा रे....

आजकाल चिमण्या दिसत नाहीत, माझ्या अंगणात, परसबागेत,
गच्चीत आणि खिडकीच्या तावदानांवर चोच मारतांनाही....

चिऊ चिऊ ये, चारा खा, पाणी पी आणि भुर्र उडून जा असं
मी फक्त लहानपणीच नाही तर अगदी काल-परवापर्यंत
म्हणत होतो आणि चिमण्याही यायच्या माझ्या परसदारी,
कधी दहा-वीसच्या टोळक्यानं तर कधी
पाच-पन्नासच्या घोळक्याने.. माझ्या बंगल्यासमोर गेली तीस वर्षे,
मोकळ्या पडलेल्या मोठ्या भूखंडावर दिसत होत्या

सैरभैर वाढलेल्या वेड्याबाबळी, आणि त्या वेड्या बाभळींवर
दिवसभर मस्ती करणाऱ्या चिमण्या....
आणि इतर काही पक्षी, अगदी युरोपातील
भोरड्याही दिसायच्या हिवाळ्याच्या दिवसात....

अवकाळी पाऊस पडला की, कॉलनीतल्या
रस्त्यावरील खड्ड्यात पाणी साचून राहायचं.....
आणि या पाण्यात मस्ती करायला
यायच्या चिमण्या अगदी सुगरणीं सह.......
रस्ते रिपेअर च्या नावाखाली कच टाकलेल्या रस्त्यांवर
चिमण्या करायच्या धूळ मस्ती,
अंगावरचे जीवजंतू काढून टाकायला....

मुक्या जीवांना चोचभर दाणे मिळावे म्हणून
मी बंगल्याच्या पार्किंग मध्ये लटकवले एक बर्ड फिडर,
ते ही स्विकारले या चिमण पाखरांनी माझ्यावर विश्वास ठेऊन.....

कंपाउंडच्या भिंतीवर ठेवलेल्या मातीच्या परळ मध्ये तर
चिमण्या रोजच यायच्या, पाणी प्यायला आणि
तुडुंब मस्ती करायला.....
त्यांना राहायलाही हक्काची जागा मिळावी,
म्हणून मी बसवले पाईपचे आणि चप्पल बुटांच्या खोक्याचे
स्वनिर्मित एक-एक घरटं.या मुक्या पाखरांचा विश्वासच
एवढा दांडगा माझ्यावर, की, तेही स्वीकारलं त्यांनी बिनबोभाट,
आपल्या पिल्लांसाठी आता, माझ्या कॉलनी समोरचा तो
मोठ्ठा मोकळा प्लॉटही विकसित करतोय म्हणे कोणी
एक मोठ्ठा बिल्डर, माणसांच्या घरांसाठी.
कॉलनी समोरचा रस्ता ही, सिमेंटचा होत आहे चकाचक.....
आता या चिमण्यांनी जायचं कुठं मातीत अंघोळ करायला,
आणि पाण्यात मनसोक्त डुंबायला?
मी माझ्या परसदारी नाही बसवणार, सिमेंट चे ब्लॉक किंवा
पॉलिश शहाबाद या चिमण्यांनो, परत फिरा रे, घराकडे आपुल्या.

**डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**
मानद वन्यजीव रक्षक
(महाराष्ट्र शासन), अहमदनगर

# तलावातील गाळ काढताना पक्षांसाठी बेटे तयार करण्याबाबत महाराष्ट्र पक्षी मित्र संघटनेचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

जालना जिल्हा हा जैव विविधतेने संपन्न जिल्हा आहे येथे एकूण पक्ष्यांच्या जवळपास १९४ प्रजाती आढळतात यामध्ये ८१ स्थलांतरित पक्षी आहेत जे हिवाळ्यात दिसतात मंगोलिया सायबेरिया इत्यादी युरोपियन देशातून आपल्याकडील तलावावर येतात जालना जिल्ह्यात अनेक लहान-मोठे तलाव असून या तलावांच्या आश्रयाने हे पक्षी राहतात. पक्षी हे पर्यावरण चक्राचे महत्त्वाचे घटक आहे. पाण्याच्या आसपास राहणाऱ्या पाण पक्ष्यांमुळे तलावांमधील अन्नसाखळी सुरक्षित राहते पण सध्या विविध तलावांमधून गाळ काढण्याचे काम सुरू आहे. हा गाळ काढल्यावर शेतकरी घेऊन जातात सध्या हा गाळ काढत असताना तलाव परिसरात मोठमोठे खड्डे तयार होत आहेत व तेथील पक्षांचा अधिवास नष्ट होण्याची शक्यता आहे. याचे दूरगामी वाईट परिणाम पक्ष्यांच्या प्रजननावर व जीवनशैलीवर होऊ शकतात गाळ काढताना पक्ष्यांचा अधिवास नष्ट होऊ नये म्हणून खालील उपाय योजना महाराष्ट्र पक्षीमित्र यांनी सुचविल्या आहेत.


१) ज्या तलावातील गाळ काढायचा आहे त्या भागात १५ फूट बाय १५ फुटाचे वर्तुळ अथवा चौकोन (तलावातील उपलब्ध जागेनुसार वर्तुळ किंवा चौकोनाचा आकार लहान मोठा घेतला तरी चालेल) चुन्याने आखून घ्यावे व आखलेला आतील भाग तसाच ठेवून वर्तुळ अथवा चौकोनाच्या चारी बाजूच्या बाहेरील भागातील गाळ काढावा. (रेखाचित्र क्रमांक १ आणि २)


२) वर्तुळ अथवा चौकोनाच्या बाजूचा गाळ काढल्यानंतर ज्या कडा राहतात त्यांना उतार द्यायचा जेणेकरून पाणी उसळताना शेवटपर्यंत जाऊन पक्ष्यांना व इतर जनावरांना पाणी पिता येईल

३) तयार झालेल्या बेटावरील माती घट्ट राहण्यासाठी काठाने बांबू, खस ,गवत किंवा कोरफड लावण्यात यावी जेणेकरून पक्ष्यांना आडोसा मिळेल तसेच या बेटावर कडूनिंब, अर्जुन, काटेसावर, किंवा काळया बाभळीचे झाड लावावे.

महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना यांच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन पक्ष्यांसाठी बेटे तयार करून पक्षी संवर्धन करण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन देण्यात आले.

अशी मागणी महाराष्ट्र पक्षिमित्र जिल्हा जालना समन्वयक ज्ञानेश्वर गिराम, पक्षिमित्र संजय हेरकर, मनोहर सरोदे, मधुकर गायकवाड, सुभाष पारे, विष्णू पिवळ यांनी निवेदनाद्वारे केली.





महाराष्ट्र पक्षीमित्र
(नोंदणी क्र. महा/२८५/९८/नागपूर)
E-mail : pakshimitra@gmail.com | Website : www.pakshimitra.org
प्रशासकीय कार्यालय : ६३,अरण्यार्पण, समता कॉलनी, कठोरा रोड, व्ही.एम.व्ही. पोस्ट, अमरावती ४४४६०४
फोन नं. ०७२१-२५५२३३४

जा.क्र.: म.प./बेटे/५ /2024
दिनांक : 29/05/2024

प्रति,
मा. जिल्हाधिकारी जालना
जिल्हा अधिकारी कार्यालय
जालना जिल्हा

विषय : जालना जिल्ह्यातील विविध तलावातील गाळ काढतांना पक्षी संवर्धनासाठी बेटं तयार करण्याबाबत.

महोदय
जालना जिल्हा हा जैवविविधतेने संपन्न जिल्हा आहे. येथे एकुण पक्ष्यांच्या जवळपास 194 प्रजाती आढळतात. या मध्ये 81 स्थलांतरीत पक्षी आहेत जे हिवाळ्याच्या दिवसात सायबेरीया, मंगोलिया, युरोपीन देशातून आपल्याकडील तलावांवर येतात. जालना जिल्ह्यात अनेक लहान -मोठे तलाव असून या तलावांच्या आश्रयाने हे पक्षी राहतात. पक्षी हे पर्यावरण चक्राचे महत्वाचे घटक आहे. पाण्याच्या आसपास राहणाऱ्या पाणपक्ष्यांमुळे तलावामधील अन्नसाखळी सुरक्षित राहते पण सध्या आपल्या अधिकार क्षेत्रातील विविध तलावांमधून गाळ काढण्याचे काम सुरू आहे. हा गाळ काढल्यावर शेतकरी घेवून जातात. सध्या हा गाळ काढत असतांना तलाव परीसरात मोठ मोठे खड्डे तयार होतात, व तेथील पक्ष्यांचा अधिवास नष्ट होण्याची शक्यता आहे. याचे दुरगामी वाईट परिणाम पक्ष्यांच्या प्रजननावर व जीवनशैलीवर होऊ शकतो. गाळ काढतांना पक्ष्यांचा अधिवास नष्ट होऊ नये म्हणून खालील उपाय सुचवित आहे, त्याचा स्विकार करावा हि नम्र विनंती.

१) ज्या तलावातील गाळ काढायचा आहे त्या भागात १५ फुट X १५ फुटाचे वर्तुळ अथवा चौकोन (तलावातील उपलब्ध जागेनुसार वर्तुळ किंवा चौकोनाचा आकार लहान मोठा घेतला तरी चालेल)चुन्याने आखुन घ्यावचे व आखलेल्या आतील भाग तसाच ठेवून वर्तुळ/चौकोनाच्या चारीबाजुच्या बाहेरील भागातील गाळ काढायला सुरवात करावयी. (रेखाचित्र क्र.१ व २)

२) वर्तुळ /चौकोनाच्या बाजूचा गाळ काढल्यानंतर ज्या कडा राहतात त्यांना उतार द्यायचा जेणे करून पाणी ओसरतांना शेवटपर्यंत जाऊन पक्ष्यांना व इतर जनावरांना पाणी पिता येईल.

३) तयार झालेल्या बेटावरील माती घट्ट राहण्यासाठी काठाने बांबु, खसचे गवत किंवा कोरफड लावण्यात यावी जेणे पक्ष्यांना आडोसा मिळेल. तसेच या बेटावर एक कडुलिंब, अर्जुन , काटेसावर व काळी बाभुळचे झाडे लावावीत.

महोदय, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना आपणांस नम्र विनंती करतो की तलाव क्षेत्रात वरील प्रमाणे गाळ काढुन पक्ष्यांसाठी बेटं तयार करावीत व पक्षी संवर्धन करण्यासाठी सहकार्य करावे,

वरील कार्यात सहकार्य अथवा मार्गदर्शन लागल्यास महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना सहकार्य करण्यास तत्पर आहोत.

सहपत्र : बेटांचे रेखाचित्र

आपल्या सहकार्याच्या अपेक्षेत.
पक्षीमित्र
संजय हेरकर
मनोहर सरोदे
विष्णु पिवळ
मधुकर गायकवाड, सुभाष पारे
(ज्ञानेश्वर जगन्नाथ गिराम
समन्वयक जालना जिल्हा
महाराष्ट्र पक्षी मित्र संघटना, नागपुर.)
9823984433
gmail: digiram@gmail.com

प्रतिलिपी : १) मा. जिल्हाधिकारी, जालना
तथा अध्यक्ष
जलसंधारण समिती, जालना जिल्हा.
जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग, जालना



# क्रॅब प्लोवर आणि तिसरे पक्षिमित्र संमेलन पन्हाळा.



**शरद आपटे**
९८९०३८४४००

नुकताच मी डॉ. एरिक भरुचा यांची मुलाखत घेण्यासाठी पुणे इथे त्यांच्या घरी गेलो होतो. उदेश माझ्या आगामी पुस्तकात त्यांच्या ध्वनी मुद्रण कामाबाबत लिहावे. अतिशय साचेबद्ध पारशी पद्धतीच्या त्यांच्या घरात माझे स्वागतही ही तसेच झाले. मी नाव वाचून चुकून आणखी एका भरुचांच्या घराची बेल दाबली आणि अतिशय नाराजीच्या अठ्या कपाळावर घेवून एका बाईने दार उघडले. माझे अनाहूतपणे येणे त्यांना मान्य नसावे.खुणेनीच त्यांनी वरचा मजला सांगितले आणि धाड कन दार लावनू घेतले. आता मात्र दोन वेळा नाव वाचून मी बेल दाबली. दरवाजाची चौकट सरळ भितीना समान्तर नेहमी असते तशी नव्हती. ती थोडी कोनात होती. पुन्हा एका निर्विक वयस्क बाईने दार उघडले आणि मी नाव सांगतच डॉक्टरना तुमच्याकडे कोणी आले आहे असे खुणेनेच सांगितले. डॉक्टर आले मी ओळख सांगताच त्यांनी थेट वरच्या मजल्यावरील त्यांच्या अभ्यासिकेत मला नेले. खोली मोठी प्रशस्त. पुस्तकांनी भरलेली कपाटे, शोध निबंधांचे, जर्नलचे गठ्ठे. असा एकूण बाज त्या खोलीचा होता. डॉक्टरनी टेरेसवर खुर्च्या मांडल्या. मला त्यांच्या मुलााखतीचे ध्वनिमुद्रण करायचे होते म्हणून आम्ही पुन्हा खोलीत येवून बसलो. डॉ. सालीम अली नंतर निसर्ग अभ्यासात आदरपर्वूक ज्या व्यक्तीचे नाव घेता येईल अशी व्यक्ती म्हणजे डॉ. भरुच्या. पक्षी निरीक्षक, लेखक खूप आहेत पण त्यांच्या संवर्धनासाठी नेमके काय केले पाहिजे हे करून दाखविणारे हे एकमेव आहेत असे माझे मत आहे. त्यांनी असे अनेक संवर्धन प्रकल्प यशस्वी राबविले आहेत. आज ते याच विषयात भारती विद्यापीठात अध्यापन करतात. या विषयातील अनेक अभ्यासक्रम त्यांनी आखले आहेत आणि त्यांची टेक्स बुक्स लिहिली आहेत. सुमारे २५ ग्रंथ आज त्यांच्या नावावर आहेत. निसर्ग संवर्धन व वैदिक काळ ते आज असा महत्वपूर्ण ग्रंथावर ते सध्या काम करीत आहेत त्यांचे वय ८१ आहे म्हणजे (१८) एकावर आठ. पक्षिमित्र संघटना आणि संमेलन हा विषय जेंव्हा येतो तेंव्हा डॉ. भरुच्यांचे नाव कधी घेतले गेल्याचे ऐकिवीत नाही. डॉ. भरुचा पुण्याचे रहिवासी. त्यांचे शिक्षण आणि पुढे सर्जन  म्हणून व्यवसाय पुण्यातच सुरू झाला. ते शालेय वयापासून पक्षिनिरीक्षण करीत असत. मेडिकल कॉलेजला असताना त्यांची आणि पक्षिमित्र सस्थेच्या सस्थापक सभासदांपैकी एक कै. डॉ. रमेश बिडवे यांच्याशी त्यांचा संबंध आला. डॉ. भरुच्यांकडे दुर्बीण आणि पुस्तके होती.पुस्तकांची विशेष देवाण घेवाण होऊन त्यांचे काम सुरू झाले. डॉ. भरुच्यांकडे कॅमेरा असल्याने पक्ष्यांच्या स्लाईड्स होत्या पण त्याचा शो करून मुलांना शिकवावे असा जनसपर्क नव्हता. तो डॉ रमेश बिडवेनी पुरविला आणि दोघे मिळून काम करू लागले. इथे डॉ. भरुचांचा पक्षीमित्रशी सबंध आला. डॉ. भरुचा आजही कबुल करतात की माझ्या कामाची पहिली प्रसिद्धी रमेश मुळे मला मिळाली. रमेश हे अतिशय निरलस आणि तळमळीचे कार्यकर्य ते होते त्यांचे स्मरण पक्षीमित्र संघटनेने ठेवले पाहिजे. १९८३ साली पन्हाळा इथे तिसरे संमेलन भरले आणि डॉ. भरुचा त्यात सामील झाले. मडंळी कोल्हापूरात जमली. प्रस्थान करण्यापूर्वी रंकाळा तलाव पक्षीनिरीक्षण बेत ठरला. सर्वजण तलावावर पोहचले. नेहमीचे पक्षी पाहताना तलावाच्या एका कोपऱ्यात उडणाऱ्या पक्ष्यांच्या थव्याने त्यांचे लक्ष वेधले. उडण्यावरून हे पक्षी वेगळे आहेत असे त्यांना वाटले म्हणून आणखी पुढे जावून ते पाहावेत आणि जमल्यास त्यांचा फोटो घ्यावा अशी त्यांची इच्छा होती. मात्र ते वेगळे नसून शेकाटे आहेत असे दुसरे मत पडले म्हणनू नाद सोडून मडंळी संमेलनास गेली. डॉ. भरुच्यांच्या मनात मात्र तो विषय तसाच घोळत राहिला आणि संमेलन संपताच ते सरळ रंकाळ्यावर गेले आणि पुन्हा तो थवा तिथेच पहिला. त्यांचे फोटो घेतले मात्र अजून पक्षी ओळखला नव्हता. पुढे तो ओळखला मात्र खात्री देता येत नव्हती कारण पुस्तकात त्यांचा आढळ फक्त समुद्र किनारे आणि तेही मुंबई पर्यंतच दाखविला होता. आता पुढे काय? म्हणून त्यांनी डॉ. सालीम अलींना पत्र लिहिले आणि भेट मागितली. एका रविवारी ते त्यांच्या घरी दाखल झाले. आपल्या स्लाईड्स त्यांनी त्यांच्या पुढ्यात ठेवल्या आणि डॉक्टर काय म्हणतात ते वाट पाहू लागले. डॉक्टरानी स्लाईड व्ह्यूवर काढला आणि एक एक स्लाईड तपासली आणि विचारले तुला कोणता पक्षी वाटतो. भरुचा भीत भीतच उत्तरले क्रॅब प्लोवर! अरे बरोबरच आहे मग तुला शंका का आली आणि इतका दूर  का आलास. पुन्हा डॉक्टर भीत भीतच सर फोटो कोल्हापुरातील रंकाळा तलावावरील आहे आणि तुमचे पुस्तक त्याचा आढळ समुद्र किनारा असे सांगते. डॉ. सालीम अलींनी एक कागद आणि पेन समोर ठेवले आणि आज्ञा केले, जर्नलसाठी इथेच बसनू शॉर्ट नोट लिही तोवर नाश्ता तयार होतोय. आज ते रेकोर्ड आहे. ते पुढे कोणी तपासले आहे का? पुढे ते पक्षी पुन्हा दिसलेत का? माहीत नाही.

# श्री. दिगंबर गाडगीळ व्यक्ती आणि प्रवास



राघवेंद्र वंजारी

महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेतर्फे देण्यात येणाऱ्या पक्षिमित्र पुरस्कारांची घोषणा झाली. २०२३ यावर्षीचा पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार श्री दिगंबर गाडगीळ यांना जाहीर झाल्याचे वाचून आनंद झाला. या आनंदाला दोन प्रमुख कारणे. पहिले कारण म्हणजे सर्वसामान्य माणूस एक उत्तम पक्षीमित्र कसा असतो याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे श्री दिगंबर गाडगीळ आणि दुसरे म्हणजे पक्षी जीवनातून वेचलेले स्वजीवनाचे अनुभव शब्दबद्ध केलेले लेखन. याची प्रचिती त्यांना भेटल्यावर झाली. त्यांच्या सोबतच्या संभाषणातून अधिक स्पष्टपणे जाणवले. त्यांच्या प्रकाशित कृतींचा परामर्श घेतल्यावर वाटले की त्यांचे विचार आणि एकंदर त्यांचा प्रवास सर्वांपर्यंत पोहोचवावा. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर जानेवारी २०२४ मध्ये पुणे येथे राघवेंद्र वंजारी यांनी गाडगीळ सरांची घेतलेल्या मुलाखतीचा पूर्वार्ध.

गाडगीळ सर, सर्वप्रथम यावर्षीच्या पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्काराबद्दल आमच्या सर्वांच्या वतीने तुमचं खूप खूप अभिनंदन.

**पक्षी निरीक्षक आणि लेखक हा प्रवास नेमका कसा सुरु झाला?**

माझ बीएससीचं शिक्षण होईपर्यंत मला याची काहीच कल्पना नव्हती. माझ्या मनात नेहमी असायचं की आपण काहीतरी सामाजिक काम करत राहिलं पाहिजे. ग्रंथालयात जायची सवय असल्याने मी त्यांच्या मंडळाशी जोडला गेलो आणि कालांतराने सार्वजनिक वाचनालय नाशिकचा सेक्रेटरी झालो. माझ्या कॉलेजच्या दिवसांपासूनच मी लेखन करायचो. १९५४ मध्ये कॉलेजमध्ये शिकत होतो. आमचे शिक्षक लिहायचे. ते प्रकाशित व्हायच. ते मी वाचायचो. त्यातून मला प्रेरणा मिळाली आणि मीही लिहू लागलो. 'सायन्स डायजेस्ट' नावाचे एक विदेशी मासिक ग्रंथालयात यायचं. त्यातूनच वैज्ञानिक लेखनाकडे माझा कल वाढला. डोळ्यातून अश्रु कसे येतात? हा माझा पाहिला विज्ञान आधारित लेख अमृत दिवाळी अंकात प्रकाशित झाला. तेव्हा ते लेखकांना सदर मानधन देत असत. एक रुपया आणि अंक अस त्याचं स्वरूप होतं आणि ते मला मिळाल. त्याच प्रकाशन गृहाचं एक दैनिकंही होतं गांवकरी नावाचं. (व्याचे मुख्य संपादक डॉ. ओ. वा. वैरडी होते. अमृतमधला लेखनाचा परिचय असल्याने १९५६ मध्ये मला त्यांच्याकडून नौकरीची ऑफर आली. मी ती स्वीकारली आणि रुजू झालो. तिथून माझ्या लेखनाला गती मिळाली. पण तेव्हा देखील पक्षीनिरीक्षणाशी सहवास आला नव्हता.

**पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार याकडे तुम्ही कसे पाहता?**

मी स्वतः कुठलाही पुरस्कारसाठी अर्ज करायचा नाही हा माझा विचार आहे. मला जेव्हा या पुरस्कारविषयी कळालं तेव्हा मी कार्यकारी मंडळीना विचारलो, हे कसं काय? कारण आपल्या पुरस्काराचा नियमच आहे की पुरस्काराला अर्ज करायचा असतो. आणि स्वाभाविकपणे मी तो केला नव्हता. त्यावर मंडळ म्हणाल की जाणकारांनी नामनिर्देशित केले तरी आम्ही विचार करतो. हा पुरस्कार सर्वाच्या एक मताने मान्य केला आहे.

**पक्षी निरीक्षणाची गोडी कशी निर्माण झाली?**

१९७९-१९८० दरम्यान नाशिक मध्ये हाऊसिंग सोसायटीत राहत असताना मी तिथल्या कार्यकारी मंडळात होतो. त्यामध्ये सुमारे ४४ घरे होती. घराच्या कामानिमित्य मी एक महिन्याची रजा घेऊन नाशिकला आलो होतो. ती कॉलनी त्यावेळी गावाच्या बाहेर होती. आजूबाजूला शेती होती. शेतावर आणि त्या परिसरात खूप पक्षी दिसायचे. सकाळी आणि सायंकाळी थवेच्या थवे उडत असताना दिसायचे. त्यांच्याकडे पाहत पाहत कुतुहलाने मी त्यांच्यात अधिकच रमलो. त्या दरम्यान नाशिक गावातून शेताकडे डॉ. पुराणिक नावाचे एक गृहस्त पक्षी बघणाच्या हेतूने यायचे. एके दिवशी आमची भेट झाली. परिचय झाला. त्यानंतर आम्ही सोबत जाऊ लागलो. त्याच्याकडे कॅमेरा होता. ते फोटो काढायचे

नाशिकपासून सुमारे ४० किलोमीटर दूर नांदुर मधमेश्वर गावाजवळ गोदावरी आणि कादवा नदीच्या सांगमावर एके दिवशी गेलो असताना पक्ष्याची मोठ्या प्रमाणात शिकार होत असल्याचं पाहिलं. मारलेले पक्षी लटकावून ठेवलेले दिसले. त्यांच्या शरीरावर गोळ्या झाडलेले स्पष्ट दिसायचं. ते पाहून गावकरी आणि महाराष्ट्र टाइम्स दैनिकात याविषयी मी एक पत्र लिहिलं. त्यातून शिकारबंदी झाली पाहिजे ही मागणी केली. त्याचा परिणाम फार मोठा झाला. मी कुणालाही भेटलो नव्हतो, बोललो नव्हतो, तरी ते पत्र सर्वश्रुत झालं. विधान सभेत या विषयावर चर्चा झाली. तिथेही शिकारबंदीची मागणी करण्यात आली.

आपणही नाशिकमध्ये जर पक्षीमित्र मंडळ गठित केली तर अशी कृत्ये थांबतील असा विश्वास होता. १९८२ साली नाशिक पक्षीमित्र मंडळाची स्थापना झाली. त्यावेळी डॉ. ठकार अध्यक्ष आणि डॉ. सुळे हे उपाध्यक्ष होते. काही तिथून माझ्या पक्षी निरीक्षणाला अधिकाधिक गती मिळाली

**सर्वात आवडता पक्षी निरीक्षणाचा दौरा किस्सा कोणता ?**

नांदुर मधमेश्वरमध्ये पक्षी पाहताना एक विस्मयकारक घटना दिसली. एका खंड्याने माश्याची शिकार केली आणि त्याच क्षणी त्या खंड्याची शिकार एका शिकारी पक्ष्याने केली. तो प्रसंग आजही आठवतो मला.

**पक्षी निरीक्षणा दरम्यान घडलेली एखादी दुखद घटना सांगू इच्छिता का ?**

अशी कोणती नाही.

**तुम्ही तुमची पहिली दुर्बिण कधी घेतली ?**

पक्षीमित्र मंडळ स्थापन झाल्यावर घेतली. नाशिकमध्ये दुर्बिण मिळत नव्हती. मित्राकडून अमेरिकेतून मागवली. आजही ती माझ्यासोबत आहे.

तुमची पक्षी निरीक्षणाची उद्दिष्टे कोणती ?

जनजागृती व्हावी. नाशिकमध्ये जेव्हा आम्ही मंडळाची सुरुवात केली लोकांना माहीतच नव्हत पक्षी निरीक्षण काय असतं. पक्ष्यांच संवर्धन झाल पाहिजे. अधिकाधिक जनजागृतीने शिकारीसारख्या गैरप्रकारावर आळा बसतो. पक्षी संवर्धनाचा प्रचार आणि प्रसार झाला पाहिजे. दिवसेंदिवस पक्षी जखमी होण्याच्या घटना खूप वाढल्या आहेत. जखमी पक्ष्यांवर उपचार करणे हे एक मोठं आव्हान आपल्या पुढे आहे. म्हणून पक्षी निरीक्षणाने लोक जोडले जातील आणि संवर्धनास बळ येईल.

शब्दांकन –
**राघवेंद्र वंजारी**
सोलापूर
९०२८७६९१८२



**मी दिगंबर गाडगीळ सरांसमवेत. जानेवारी २०२४, पुणे.**



समानशीलेषु व्यसनेशु सख्य' असं म्हणतात ते काही खोटं नाही. कारण सुरुवातीला एकटेच पक्षिनिरीक्षण करता करता साधारण २००७ - ०८ च्या दरम्यान त्यांना पक्षीनिरीक्षणाची आवड असलेले अनेक सवंगडी लाभले. मग त्यांचा एक छान ग्रुप तयार झाला आणि या सवंगड्यांमुळे त्यांना अनेक नवे पक्षी, त्या पक्ष्यांची वैशिष्ट्य वगैरे बाबत माहितीचे भांडारच जणू उघडले. आपल्या आवडीच्या क्षेत्रातील अधिक माहिती व ज्ञान मिळवण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. 'चातक निसर्ग संवर्धन' संस्थेचे सचिव म्हणूनही उदयजी कार्यरत आहेत. उदयजींना या क्षेत्रातील गुरुतुल्य असलेल्या अनील महाजन यांच्याकडून बदकांचे, त्यांच्या प्रजातींमधले बारकावे ओळखायला शिकायला मिळाले. शिपले फोडून त्यातून आपले अन्न खाणारा ओपन बिल डक, चमच्यासारखी चोच असलेला डक असे विविध प्रकार अनीलजींनी त्यांनाओळखायला शिकवले. तसंच एकदा, पाल अभयारण्यात मारूती चित्तमपल्ली यांच्यासमवेत फिरत असताना विक्रम पाटील सरांनी ओळख करून दिलेला 'वंचक' पक्षीही उदयजींच्या कायम स्मरणात राहिला आहे. या पक्ष्याची विशेषता म्हणजे आकाशात उडताना तो पांढरा दिसतो आणि बसल्यावर तो मातीशी इतका कॅमोफ्लाज (भवतालाशी रंग जुळवून घेणे) साधतो की तो दिसतच नाही ही या पक्ष्याची गंमत जेव्हा विक्रमजींनी दाखवली त्यानंतर हा अनोख्या नावाचा पक्षी उदयजींच्या मनात कायमचा ठसला. पक्षिनिरीक्षणाचा छंद जोपासताना त्यांना गणेश सोनार, अश्विन पाटील, शिवाजी जवरे सर यांचेही मार्गदर्शन वेळोवेळी मिळाले आहे.

**काम हाच राम :**

पक्षीनिरीक्षणाचा छंद जोपासताना उदयजींनी ग्रामसेवक म्हणून असलेली आपली मुख्य जबाबदारीही उत्कृष्टपणे सांभाळली आहे. त्यांच्या कार्यामुळे २००७-०८ साली उदयजींना आदर्श ग्रामसेवक

**फुलपाखरू उद्यानाचा प्रस्ताव**

उदयजींनी पक्ष्यांबरोबरच फुलपाखरांचीही आवड जपली आहे. त्याबद्दलची माहिती व मार्गदर्शन त्यांना राजू कासंबे सरांकडून

## ग्रामसेवकातील पक्षिप्रेमी

वेळोवेळी मिळाले आहे. तांदलवाडी येथील हतनूर जलाशयाजवळ फुलपाखरू उद्यान करण्याबाबत जेव्हा चातक संस्थेच्या माध्यमातून त्यांनी व अन्य सदस्यांनी वनविभागाला सुचवले त्यानंतर संबंधित प्रस्ताव वनविभागाने पुढे पाठवला. आता लवकरच याठिकाणीही फुलपाखरू उद्यान विकसित होईल अशी आशा आहे.

**पक्ष्याला जीवदान देण्यासाठी अशीही तडजोड**

उदयजींनी आजवर कित्तीतरी पक्ष्यांना जीवदान दिलेले आहे. याबाबत एक बोलकी आठवण म्हणजे एकदा त्यांनी एका शिक्रा पक्ष्याला वाचवून घरी आणले. शिक्रा पक्षी मांसाहारी असतो, पण उदयजींच्या घरात फक्त शाकाहारच, अशावेळी त्या पक्ष्याला मांसाचे तुकडे घालणं आणि त्याचं पोट भरणं ही जबाबदारी कशी निभवायची हा प्रश्नच काही क्षण पडला. पण तरीही त्या मुक्या प्राण्यासाठी उदयजींनी घरी थोडेसे मांसाचे तुकडे आणले आणि त्या पक्ष्याला जेऊ घातले. पोटभर अन्न मिळताच पक्ष्याला तरतरी आली आणि तो आकाशात झेपावला. असंच एकदा उदयजी नेहमीप्रमाणे पक्षिनिरीक्षणासाठी जात असताना एका काटेरी बाभळीच्या झाडावरून पंखांची फडफड ऐकू आली. बारकाईने पाहिल्यावर एक रंगीत तितर तिथे उलटे लटकले असल्याचे दिसून आले आणि त्याच्या पायाला जाळे अडकल्याने त्याला उडता येत नव्हते. मग उदयजींनी पुढाकार घेत एका मित्राच्या साह्याने तब्बल अर्धा ते पाऊण तास तिथले गवत व काटेरी झुडुपे छाटली, मग त्या झाडावरच्या रानवेलींचा पसारा कापला. पक्ष्याच्या पंखाच्या फडफडीच्या आवाजाचा अंदाज घेत त्याच्या भवतालच्या सर्व फांद्या व वेली छाटत अखेर ते त्याच्यापर्यंत पोचले आणि मग ज्या फांदीवर तो पक्षी अडकला होता ती तोडून अलगद झेलली. नंतर त्याच्या पायातील अडकलेला धागा कापला आणि क्षणार्धात त्या रंगीत तितराने खुल्या अस्मानी झेप घेतली, तो क्षण अवर्णनीय आनंदाचा

आपले काम आणि आपले जीवन यांचे संतुलन आपण कसे साधता या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या आदर्श दिनक्रमात दडलेले आहे. दररोज सकाळी नियमीतपणे योगा करणे आणि दिवसभर काम करून घरी परतल्यावर पुन्हा संध्याकाळी नेमाने ५ ते ७ किमी पायी फिरायला जाणे या सवयींचा त्यांनी आपल्या दिनक्रमात आवर्जून समावेश केलेला आहे. इतकेच नव्हे तर ते उत्कृष्ट क्रीडापटूही आहेत. भालाफेक, खोखो, क्रिकेट, फुटबॉल आदी क्रीडाप्रकारांमध्ये त्यांनी विशेष प्रावीण्य मिळवलेले आहे.

**शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन :**

आजवर तब्बल २३ अभयारण्यात त्यांनी भटकंती केलेली आहे. कान्हा, सातपुडा, मेळघाट, यावल, ताडोबा, मुक्ताई-भवानी, वान, नवेगाव - नागझिरा अशा अनेक अभयारण्यांसह

फुलपाखरू, वन्यजीवन यांचा अभ्यास व गणनेत सहभाग घेऊन वनविभागास सहकार्य केले आहे. त्याचबरोबर हतनूर जलाशय परिसरातील पक्ष्यांच्या १४७ प्रजातींचे निरीक्षण व नोंदी उदयजींनी केलेल्या आहेत. फुलपाखरांच्या ७२ प्रजातींच्या नोंदी घेऊन या सर्वांचे फोटोग्राफ्स, व्हिडीओच्या माध्यमातून डॉक्युमेंटेशनही केलेले आहे. आपल्या भटकंतीच्या द्वारे मिळालेल्या माहितीच्या साह्याने शालेय विद्यार्थ्यांना या विषयाची गोडी लागण्यासाठी ते कार्य करत असतात. स्लाईड शो, पक्ष्यांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन भरवणे आदी माध्यमातून त्यांचे कार्य सुरू आहे. आपल्या मुख्य कामाला पूर्ण न्याय देत त्यासह एखादा असा छंद जो केवळ आपल्याला आनंद देतो म्हणून जोपासणे आणि त्या माध्यमातून सामाजिक योगदानही देणे यासाठी उदयजींसारख्या व्यक्तींचा आदर्श निश्चितच घ्यायला हवा.



****






**संभाजीनगर (औरंगाबाद) येथे पक्षिमित्र सभासदांची सभा पार पडली या सभेत पक्षिमित्रच्या कार्याविषयी चर्चा करण्यात आली यावेळी म.प.चे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर कार्यवाह डॉ. गजानन वाघ, सदस्य डॉ. किशोर गठडी प्रा. रमेश चोंढीकर व इतर सदस्य**

# स्वागत नविन सभासदांचे

(दिनांक ०१ एप्रिल २०२४ ते ३० जून २०२४ )

| क्र. | गाव | नाव | फोन नं. | ई. मेल |
|---|---|---|---|---|
| १५७४ | मुंबई | श्री. राघवेंद्र राजाध्यक्ष | 9892877790 | rajadhyakshrm@gmail.com |
| १५७५ | ठाणे | श्री. कौस्तुभ आठले | 9920415017 | krukaustubh@gmail.com |
| १५७६ | मुंबई | श्री. दिलीप पाटील | 9821018002 | trivector2001@gmail.com |
| १५७७ | मुंबई | फ्रान्सिस डिसूझा | 9820123193 | fd56544@gmail.com |
| १५७८ | ठाणे | श्री गणेश त्रंबक शेंडे | 8530888239 | ganesh.shende@gmail.com |
| १५७९ | सांगली | श्री. अमोल स. जाधव | 9921034555 | goldeneagle005@gmail.com |
| १५८० | पालघर | श्री. दिलीप अनंत राउत | 9850833848 | draut12@gmail.com |
| १५८१ | ठाणे | कु. प्रीती रेडीज | 9820216337 | priti.v.redij@gmail.com |
| १५८२ | डोंबिवली | श्री. प्रशांत रेवाळे | 9004670333 | prashant.rewale@gmail.com |
| १५८३ | मुंबई | कु. जयश्री भट | 9820631740 | jbhat09vgmail.com |
| १५८४ | मुंबई | श्री. संदीप अ. पटवर्धन | 9869017981 | sanpat1964@gmail.com |
| १५८५ | ठाणे | श्री. शैलेश पेंडसे | 9960505192 | photobito1976@gmail.com |
| १५८६ | मुंबई | सौ. शिल्पा दामले | 9833068550 | givshilpa@gmail.com |
| १५८७ | मुंबई | सौरभ सु. भोंगळे | 9004764390 | saub99@gmail.com |
| १५८८ | नागपूर | श्री. उमेश अ. कोटेवार | 8275039306 | umeshškotewar@gmail.com |
| १५८९ | अमरावती | प्रा. डॉ. हेमंत खडके | 9822841190 | hemantkhadke65@gmail.com |
| १५९० | अमरावती | प्रा. डॉ. मनोज तायडे | 9405352596 | manojtayade1563@gmail.com |
| १५९१ | अमरावती | प्रा. डॉ. माधव पुटवाड | | |
| १५९२ | नागपूर | श्री. अशोक व. मासोदकर | 9011192047 | avmasodkar@gmail.com |
| १५९३ | पुणे | सौ. समृद्धी दीपक पानसरे | 7030620019 | samrudhdipansare@gmail.com |
| १५९४ | सोलापूर | डॉ. विधीन सुंदर कांबळे | 8806078887 | vidhinkamble16@gmail.com |
| १५९५ | चंद्रपूर | आकाश प्र. धांडे | 8329997405 | roshanihirudkar@gmail.com |
| १५९६ | परतवाडा | डॉ. रणजीत दीपक चित्रकार | 9850735735 | chitrakar.ranjeet@gmail.com |

# टपाल तिकिटांच्या दुनियेत
# राखी बगळा
## Grey Heron (Ardea cinerea)





**रवींद्र वामनाचार्य**
नाशिक
मोबाईल नं. : ९८९०३९०५२७
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in


राखी बगळा हा हेरॉन कुळातला तुरेवाला करकोचा सव्वा तीन फूट उंच असतो. हडकुळ्या लांब व उघड्या पायाचा पक्षी पाणथळ जागेत आढळतो. वरून राखी रंगाचा असून डोके व मान पांढऱ्या रंगाची असतात. शरीराची खालची बाजू राखट पांढरी असते. लांबट मान इंग्रजी 'ड' आकाराची असून डोके अरूंद असते आणि जाड निमुळती खंजीरासारखी चोच असते. डोक्यावर लांब काळा तुरा असतो. मानेच्या मध्यावर खालच्या बाजुला काळया ठिपक्यांची ओळ असते. छातीवर लांब काळया रेघा असलेली पांढरी पिसे असतात. राखाडी करडया रंगाचा हा ऐटबाज पक्षी गळयावर चितारल्यासारख्या दिसणाऱ्या वेलबुट्टीवजा नक्षीमुळे सहज ओळखता येतो. त्याच्या फिक्या रंगामुळे पाहिल्या बरोबर प्रथम हा कोणी युरोपकडला पक्षी असावा असे वाटते. याचे दुसरे कारण असे की तो इतर पक्ष्यांपासून दूर एकांतवासच पसंत करतो. मादी नरासारखीच दिसते फक्त तिच्या डोक्यावरचा तुरा व छातीवरील पिसे उठावदार नसतात.

हा पक्षी समुद्राकाठी/तळ्याकाठी, नदी किनारी अशा कुठल्याही जलाशयावर पहावयास मिळतो. हा सहसा एकटाच पाण्यात स्तब्धपणे उभा राहुन पाण्यातील आपल्या नजरेत येणाऱ्या बेडकांची व माशांची प्रतिक्षा करतांना दिसून येतो. माशांची वा बेडकांची हालचाल झाल्यास तो लगेच तत्परतेने आपली लांब वाकलेली मान सरळ पुढे झुकतो व चोच भक्ष्य पकडण्यासाठी तयार करून निश्चल उभा रहातो व लगेच आपली चोच झपाट्याने फिरवून भक्ष्य पकडतो. हया पक्ष्याचे घरटे पाण्यालगत असलेल्या उंच झाडावर माचाचे असून काटक्यांचे बनविलेले असते. माचाच्या मध्यभागी उथळ खळगा असुन त्यावर थोडे गवत असते. इतर करकोचे व बगळयांच्या घरट्यालगत याचे घरटे असते. मादी एका वेळी ३ ते ६ अंडी घालते. अंडी निळसर हिरव्या रंगाची असतात.

अशा या सुंदर पक्ष्यावर बांगला देशाच्या टपाल विभागाने सहा टका किंमतीचे टपाल तिकीट प्रकाशित केले आहे. तसेच मालदिव सरकारच्या टपाल विभागाने एक मिनीयेचर आकाराचे टपाल तिकिट राखी बगळयावर प्रकाशित केले आहे त्यात या बगळयाच्या अधिवासाची कल्पना येते.









भारतात आढळणाऱ्या नदी टिटवी (River Lapwing) प्रमाणे दिसणारी परंतु आफ्रिका व युरोपीय देशांमधे आढळून येणारी Spur-winged lapwing or spur-winged plover (Vanellus spinosus) ही प्रजाती भारतात प्रथमच आढळून आली होती. हा पक्षी कधीच स्थलांतर करीत नाही किंवा यापूर्वी कधीही भारतीय उपखंडात नोंदविला गेला नसल्याने ही नोंद विशेष ठरली. हा पक्षी बघायला म.प.चे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर व सौरभ जवंजाळ नुकतेच तेलंगणा राज्यातील वारंगल येथे जाऊन आलो. दोन दिवस थांबून हा पक्षी बघितला, निरीक्षण केले. यासाठी वारंगल येथील  पक्षी मित्र व हा पक्षी Spur-winged lapwing असल्याचे ज्यांनी सांगितले ते नागेश्वर राव इंदराम यांचे सहकार्य लाभले



भारतीय प्राणी सर्वेक्षण म्हणजेच Zoological Survey of India च्या पुणे येथील पश्चिमी प्रादेशिक केंद्र येथे महाराष्ट्र पक्षीमित्रच्या शिष्टमंडळाने नुकतीच भेट दिली. यावेळी ZSI चे प्रभारी संचालक डॉ. बासुदेव त्रिपाठी यांचे समवेत पक्षी संशोधन व महाराष्ट्र पक्षिमित्रची भुमिका याबाबत सविस्तर चर्चा झाली. या सभेत ZSI चे Scientist-C डॉ शामकांत तलमले, Scientist-E डॉ अपर्णा कलावटे, डॉ. के. पी. दिनेश सहभागी झाले होते. यावेळी Collection Department, Museum व इतर विभागात भेट देऊन तेथील कार्याविषयी माहिती जाणून घेतली, यावेळी श्रीमती रीता देब, सुनील साळुंखे यांचेशी भेट व चर्चा झाली. महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फेअध्यक्ष डॉ. जयंत वडतकर, कार्यवाह डॉ. गजानन वाघ तसेच सभासद ॲड. राजमेहर निशाने व श्री सौरभ जवंजाळ उपस्थित होते.

Book Post

प्रती,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षीमित्र**
६३, अरण्यार्पन समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
संपादक : **दिगंबर गाडगीळ**
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी
संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : **ज्ञानपथ प्रकाशन**
**मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन**